समृध्द शिक्षण संस्कारांसाठी
मासिक

# शिक्षणयात्री

■ वर्ष: ९ वे
■ जानेवारी २०२४
■ अंक: १ ला
■ किंमत: ५० रूपये

## भविष्यवेध!



## आयुष्य

(वृत्त -आनंदकंद)

आयुष्य हे असावे, माझे जुगार बहुधा
प्रारब्धही दिले मग,त्याने भिकार बहुधा

मी वादही कुणाशी, केला कधीच नाही
जे भेटले मला ते,होते सुमार बहुधा

का नेहमी सुखांनी, मज टाळले कळेना
हे दुःख हाच माझा, आहे करार बहुधा

डोळ्यातल्या नदीला, तू बांध घाल आता
मी जाणतो तिचाही, आला नकार बहुधा

रक्तातही अता ते, घेतात शोध कसला?
ह्या दंगली घडाव्या, आहे विचार बहुधा

त्यांनी कधी न केला, उत्कर्ष माणसांचा
नेते असेच तिथले, होते टुकार बहुधा

'श्रीराम' वागतो हा, हल्ली बरा जरासा
डोक्यातही असावा, थोडा सुधार बहुधा

**बाळू श्रीराम**
९०११९७००७३



समृध्द शिक्षण संस्कारांसाठी
मासिक

# शिक्षणयात्री

● जानेवारी-२०२४
● वर्ष- नववे ●अंक- पहिला

**संपर्क -**
संपादक शिक्षण यात्री
शैलनंद,प्लॉट नं.५२ शिवपार्वती कॉलनी करवंद नाका,
मु.पो.ता.-शिरपूर जि-धुळे ४२५४०५
(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)
Email : shilshanyatri11@gmail.com
www.shikshanyatri.com

**संस्थापक संपादक** ❑
शैला नंदकिशोर हजारे

**मार्गदर्शक** ❑
मा.पुरुषोत्तम भापकर (भाप्रसे)

**संपादक मंडळ** ❑
डॉ.युवराज पवार,युवराज माने
संदेश हजारे

**संह संपादक** ❑
मा.सुभाषदादा कुलकर्णी

**मुद्रित शोधन** ❑
डॉ.युवराज पवार

**मुखपृष्ठ** ❑
साभार, आंतरजाल

**अक्षर जुळणी** ❑
प्रगती आर्टस्, शिरपूर

**लेखात व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावी. पीआरबी ॲक्टनुसार कायदेशीर जबाबदारी कार्य.संपादकांची राहील. सर्व दावे शिरपूर न्यायकक्षेंतर्गत.**

# अंतरंग


**सरत्या वर्षाला निरोप देतांना**
प्रतिभा सराफ /४

**मानव अधिकार विकास**
प्रा.डॉ.महेंद्र पाटील/६

**एक गोष्ट राजर्षी शाहूंची**
विजय गायकवाड/१०

**सेवाव्रती**
डॉ.अतुल बडगुजर/१२

**जागतिक दर्जाचे भविष्यवेधी शिक्षण**
निलेश घुगे/१५

**टाचा उंच करून वाट पहाणारा**
युवराज माने /१८

**आठवणीतले गुरूजी...ना.का.साठे !**
सी.डी.पाटील /२०

**एक स्वच्छतादूत**
कैलास वाघ /२२

**ब्लॅक रेन फ्रॉग !**
प्रा.डॉ.नंदा हरम /२४

**चटकन डोळ्यात पाणी आणणारी कविता भुई आणि बाई**
प्रा.युवराज पवार /२६



**वार्षिक : रू.५००/-** | **द्वैवार्षिक : रू.९००/-** | **त्रैवार्षिक : रू.१३००/-**

**शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.**

**Online पेमेंट साठी - खाते नाव-शिक्षणयात्री** Shikshanyatri

**बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत)** No.13320200000322

IFSC Code : BARB0SHIRPU

**वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे**



**संपर्क पत्ता-**
**संपादक शिक्षण यात्री**
**शैलनंद,प्लॉट नं.५२ शिवपार्वती कॉलनी करवंद नाका,मु.पो.ता.-शिरपूर जि-धुळे ४२५४०५**
**(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)**



**लेखात व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावी पीआरबी अॅक्टनुसार कायदेशीर जबाबदारी कार्य.संपादकांची राहील सर्व दावे शिरपूर न्यायकक्षेंतर्गत.**

# संपादकीय..

जानेवारीचे वीस दिवस उलटले. मित्राने एक तारखेला केलेल्या संकल्पाचे काय झाले याची उत्सुकता होती. म्हणूनच मित्राने शरीरसंपत्तीसाठी योग वर्गाची केलेल्या सुरूवातीचा उत्साह किती टिकून आहे हे पहाण्यासाठी भल्या पहाटेच योग वर्गाला भेट दिली. आणि मनात होते तेच चित्र पहायला मिळाले. मित्र वर्गाला हजर नव्हता! केलेला संकल्प मोडला. वर्गाला मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांना याबाबत विचाले तर त्यांचा अनुभवही फारसा वेगळा नव्हता. दर महिन्याच्या एक ते दहा तारखेपावेतो वर्गाला साधकांची गर्दी असते. नंतर मात्र नियमित येणाऱ्यांची संख्या कमी होत जाते. आताही तसेच होते. जानेवारी नववर्षाच्या सुरवातीला योग अभ्यासासाठी अनेकांचा उत्साह दिसून आला. मात्र आता तो उत्साह टिकून राहिला नाही.

एकूणच संकल्पांचे होते तरी काय? संकल्प केवळ नव्याचे नऊ दिवस ठरतात. उत्साहात सुरू केलेली एखादी गोष्ट अंगवळणी पडतच नाही. जुन्या सवयींच्या ओझ्याखाली संकल्प दबले जातात. नव्हे तर संकल्पांना पूर्णत्वास नेण्यात आपलीच मानसिकता जबाबदार ठरते. कारण आज नव्हे तर उद्या बघू हा आपला 'मंत्र' आहे. आळस, कंटाळा नवीन काही करण्याच्या मनसुब्यावर पाणी फिरवतांना दिसतात आणि सुरवातीच्या दिवसात असलेला उत्साह पुढे काही दिवसातच मावळलेला दिसतो.

असो, एकंदरीत आम्ही देखील नववर्षापासून काही संकल्प केलेत. मासिकात काही बदल करावेत, वाचकांना दर्जेदार आशय वाचण्यास पूरवावा, महत्त्वाचे म्हणजे मासिक नियमित प्रकाशित व्हावे. या अशा काही शक्य संकल्पांची मांडणी आम्ही देखील केलीय. नियमित मासिकाची मुद्रण आवृत्ती काढणे हे तितकेसे सोपे नसतांना आमचा हा प्रयत्न किंवा संकल्प किती दिवस टिकतो हे पहाणे महत्त्वाचे ठरेल.

❑ **संपादक**

प्रासंगिक

# सरत्या वर्षाला निरोप देताना ...



**प्रतिभा सराफ**
मुंबई

निरोपाचा क्षण कातरच असतो. चार दिवस घरात आलेले पाहुणे घराबाहेर जाताना पाहुण्यांसहित घरच्यांचेही डोळे पाणावतात. ऋणानुबंध कोणाशी आणि कधी जुळून येतील ते सांगता येत नाही. कधी कधी परिस्थिती अशी असते की आपल्याला आणि त्यांनाही माहीत असते की ही शेवटची भेट आहे. अगदी रात्रभर सोबत करणारे ट्रेनमधील प्रवासी असोत की एखाद्या पिकनिकदरम्यान हॉटेलच्या टेबलवर भेटलेले प्रवासी असोत. जर माणूस कायमचा सोडून गेलेला असेल तर त्याचे साश्रूनयनाने घेतलेले शेवटचे दर्शन असो. निरोपाचा क्षण कातरच असतो, काही क्षणांसाठी कधीकधी आयुष्यभरासाठी.

पण सरत्या वर्षाला निरोप देताना मात्र आपल्याला खूप आनंद होतो कारण पुढील वर्ष डोळ्यासमोर असते. झालेल्या काही चुका सुधारण्याची संधी असते. नवीन प्रकल्प हाती घेण्याची उभारी असते.


भारतात सर्व जाती-धर्मांमध्ये नवीन वर्ष हे वेगवेगळ्या सणांपासून सुरू होते परंतु ब्रिटिश जेव्हा भारतात आले तेव्हापासून कॅलेंडर वर्ष संपते तेव्हापासून नवीन वर्ष सुरू होते, असे आपल्या मनावर बिंबवले गेले आणि तो दिवस आपण साजरा करायला सुरुवात केला, असे कोणाच्यातरी भाषणात ऐकले परंतु त्याचे संदर्भ काही सापडले नाहीत.

असो. अलीकडे भारत देशातील सर्व जाती-धर्मांचे लोक त्याचप्रमाणे जगभरातील लोक कॅलेंडर वर्षानुसार नवीन वर्ष साजरे करतात. खरंतर एका दृष्टीने ही चांगली गोष्ट आहे कारण त्या निमित्ताने तो एकच सण मोठ्या प्रमाणात जगभरातून एकाच दिवशी साजरा होतो. एकतेची भावना निर्माण होते.

सरत्या वर्षाला निरोप देताना या वर्षभरात घडलेल्या सर्व घडामोडी आपल्याला आठवतातच.

या वर्षाची सुरुवात रशिया आणि युक्रेनच्या युद्धाने झाली. अनेक प्रियजन मारले गेले. मालमत्तेचे नुकसान झाले. राजकीय अशांतता पसरली. युरोपीय देशांना मंदीचा फटका बसला, तेलाच्या किमती वाढल्या, चलनवाढही झाली ज्याची झळ जगभरात पसरली.

अमेरिकेतील चक्रीवादळ, कॅलिफोर्नियात आलेला पूर, टर्की आणि सीरियाला बसलेला भूकंपाचा हादरा, भारतातील चेन्नईमधील चक्रीवादळ असे काही न भरून येण्यासारखे



जबरदस्त नुकसान झाले.

'हवामान बदल' हा मुख्यत्वे मानवनिर्मित आहे. वाढते प्रदूषण यामुळे आजारपण वाढते आहे. वृक्षतोडीमुळे प्राणवायू घटत चालला आहे त्यामुळे शारीरिक आणि मानसिक अस्वस्थता वाढत आहे.

भारत 'क्रिकेट विश्वचषक फायनल'मध्ये पराभूत झाला, ही गोष्ट सुद्धा भारतीयांच्या मनाला दुःख देऊन गेली. खरंतर आणखीही खूप सार्या गोष्टी आहेत. काही गोष्टींना आपण आळा घालू शकतो. काही गोष्टी आपल्या हाताबाहेर आहेत पण यावर्षी काय सकारात्मक घडले तेही पाहूया–

भारताच्या चांद्रमोहिमेने जगभरात भारताची मान उंचावली आहे. चंद्राच्या दक्षिण भागात चांद्रयान उतरवणारा भारत पहिला देश ठरला आहे.

मुंबई–दिल्ली एक्सप्रेस रस्त्याचा काही भाग आणि मैसूर–बंगळूर रस्ता चालू झाल्यामुळे महत्त्वाची शहरे जोडली गेली आहेत, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात वेळेची बचतही होणार आहे.

भारताला अत्यंत मानाचे समजले जाणारे, दोन ऑस्कर पुरस्कार मिळाले आहेत. बेस्ट डॉक्युमेंट्री शार्ट फिल्म या ऑस्कर पुरस्काराच्या श्रेणीतून भारताच्या 'द एलिफंट व्हिस्परर्स' साठी आणि 'आरआरआर' या चित्रपटातील 'नाटू नाटू' गाण्याला बेस्ट ओरिजनल साँग यासाठी ऑस्कर पुरस्कार मिळाले आहेत.

हे तंत्रज्ञान विकसित झाल्यामुळे अनेक क्षेत्रात फायदा होणार आहे पण तरीही या अद्भुत तंत्रज्ञानामुळे एका भयावह मानसिकतेतून आपण जात आहोत. इथे मला एक छोटेसे उदाहरण द्यायला आवडेल की एक काडेपेटी जर आपल्या हातात आहे तर आपण देवापुढे एक दिवा लावू शकतो किंवा कोणाचे घर जाळण्यासाठी आग लावू शकतो. हे तंत्रज्ञान तसेच आहे. याचा योग्य उपयोग केला तर आपण आपल्या देशाची निश्चितपणे खूप प्रगती करू शकतो.

भारताला संसदेची नवीन इमारत मिळाली, जे ठिकाण खूपच आकर्षक आहे.

भारत जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश बनला, या घटनेला चांगल्या की वाईट घटनेसाठी मान्यता द्यावी बरे, हे आपणच ठरवावे.

तर अशा सुखद आणि दुःखद घटनांचा मागवा घेत नेमकेपणाने काय करता येईल याचा विचार आपण केला पाहिजे कारण नवीन येणारे वर्ष नेहमीच आशादायी असते!

देशाने काय करायचे याचा विचार करण्यासाठी आपल्याकडे नेतेमंडळी आहेत, शास्त्रज्ञ आहेत परंतु आपण नेमके काय करायला हवे होते आणि केले नाही याचा विचार सरत्या वर्षाला निरोप देताना प्रत्येकाने केला पाहिजे. राहिलेले संकल्प पूर्ण केले पाहिजेत. ते यावर्षी का पूर्ण झाले नाहीत याचाही विचार केला पाहिजे.

साप जसा सहजच कात टाकून सळसळतो, तरुण होतो त्याचप्रमाणे आपणसुद्धा सरत्या वर्षाला निरोप देऊन दुःखाची, अशुभतेची, भीतीची, अस्वस्थतेची कात टाकून नव्या जोमाने, मनाने तरुण होऊन, कार्यक्षम होऊ या. 'जो हुआ सो हुआ' असे म्हणत कोऱ्या पुस्तकाचे नवीन पान उलटू या, चला नवीन वर्षाचे स्वागत करू या!

**मुंबई**
**–९८९२५३२७९५**

प्रासंगिक

# मानव अधिकार विकास आणि वैश्विक मानव अधिकार घोषणापत्र



**प्रा.डॉ.महेंद्र पाटील**
धुळे

प्रत्येक व्यक्तीस निसर्गाकडून जन्मजात अधिकार मिळाले आहेत असे प्राचीन काळापासून मानले जाते. मानव अधिकारांची मुळे नैसर्गिक अधिकार संकल्पनेत सापडतात. नैसर्गिक अधिकार संकल्पनेनुसार प्रत्येक व्यक्ती जन्माला येताना काहो अधिकार घेऊन येत असतो. त्या अधिकारावर प्रतिबंध लादण्याचा बा नियंत्रण ठेवण्याचा अधिकार शासनाला नाही. शासनाने अधिकारावर नियंत्रण प्रस्थापित करण्याऐवजी त्यांचा योग्य पद्धतीने वापर करता येईल असे परिस्थिती निर्माण करणे हे शासनाचे प्रदान कर्तव्य आहे असे नैसर्गिक अधिकार संकल्पनेत मानले जाते मानवी जीवनाला आनंदी बनविण्यासाठी मानवी अधिकाराची संकल्पना जगात उदयाला आली मानव अधिकार संकल्पना मानवी अस्तित्वाशी निगडीत आहे जन्मतः वा स्वभावतः मानवाला काही विशिष्ट अधिकार असतात आणि हे अधिकार मानवी जीवनाच्या विकासासाठी आवश्यक असतात असे मानव अधिकार संकल्पना सांगते. परंतु प्राचीन काळापासून मानवाला मानव अधिकार प्राप्त करण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे.

मानव अधिकारांची ऐतिहासिक पार्श्वभूमी – मानव अधिकार संकल्पना २० व्या शतकात लोकप्रिय झालेली असली तरी हे अधिकार प्राचीन काळापासून समाजात अस्तित्वात होते. मानव अधिकाराचा उगम ग्रीक आणि रोमन काळात झालेला दिसतो. सांक्रेटिस आणि प्लेटो. ॲरिस्टॉटल यांनी मानव अधिकाराचा विचार नैसर्गिक कायदा आणि राजकिय अधिकार आणि राजकीय आदर्शवादाची संदर्भात केलेला आढळतो. मार्कस सिसेरो सारख्या रोमन कायदे पंडिताने मानवाला मिळालेले काही अधिकार हे राज्याच्या अस्तित्वाच्या आधीपासून अस्तित्वात आहेत असे मत व्यक्त केले. थॉमस ॲक्विनॉस, सेंट आगस्टाईन या मध्ययुगीन ख्रिस्ती परंपरेचे समर्थन करणा–या विचारवंतांनी देखील मानव अधिकार संकल्पनेतील अनेक महत्त्वपूर्ण अधिकाराचा आपल्या लेखनात उल्लेख केलेले दिसतो. १२१५ चा 'मॅग्ना कोटा' सनदेला राजा जॉनने मान्यता देऊन मानव अधिकार संकल्पनेला अधिकृत केले. इंग्लंडमध्ये लोकशाहीचा विकास होत असतांना बिल ऑफ राईट, पिटीशन ऑफ राईट ३ कायदयांनी मानव अधिकारांच्या विकासात मोलाची भर घातली. युगो प्रॉशियस यांनी

आधुनिक आंतरराष्ट्रीय कायदयातील नवीन तत्त्वांचा पाया घातला. त्याने व्यक्तीच्या नैसर्गिक अधिकारांना आधुनिक स्वरूप प्राप्त करून दिले थॉमस हॉब्ज, जॉन लॉक, आणि रूसोसारख्या करारवादी विचारवंताने सामुहिक ईहेच्या संकल्पनेच्या माध्यमातून मानवी हक्काला आपल्या लेखनात महत्त्वपूर्ण स्थान दिले इंग्लंडमध्ये संसद आणि राजा यांच्या संघर्षात निर्माण झालेल्या पिटिशन ऑफ राईट, बिल ऑफ राईट, बंदीप्रत्यक्षीकरण इत्यादी कायदयातून मानव अधिकाराचा विकास मदत मिळाली थॉमस जेफरसन यांनी अमेरिकन स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यातून अनेक मानवी अधिकारांची घोषणा केली. फ्रेंच राज्यक्रांती आणि अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनाम्यानंतर मानव अधिकार संकल्पना जनसामान्यामध्ये रुजण्यास प्रारंभ वा सुरूवात झाली. फ्रेंच राज्यक्रांतीतून स्वातंत्र्य, समता आणि बुंधता या मानव अधिकार पूरक वैश्विक तत्त्वांची उद्घोषणा झाली. अमेरिकन स्वातंत्र्य युद्धाच्या जाहीरनाम्यात सर्व माणसे जन्मतः समान असून निर्मात्याने त्यांना जगण्याचा, स्वातंत्र्याचा आणि सुख मिळविण्याचा अधिकार दिला आहे. ही महत्त्वपूर्ण गोष्ट नमूद केली. मानव अधिकाराचे विविध विचारवंतानी समर्थन केलेले असले तरी उदारमतवादी आणि उग्रवादीनी आलोचना केली. १९१९ मध्ये स्थापन झालेल्या आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने मानव अधिकाराशी संबंधित अनेक अधिकारांची आंतरराष्ट्रीय पातळीवर चचर्चा सुरू केली त्या अधिकारांना विविध राष्ट्रांनी मान्यता दयावी म्हणून प्रयत्न देखोल केले. पहिल्या महायुद्धानंतर मानब अधिकारांचे सार्वभौतिकीकरण करण्याचा प्रयत्न व्हर्साय करारानुसार करण्याचे प्रयत्न केले गेले पण ते यशस्यो होऊ शकले नाही. पहिल्या महायुद्धानंतर स्थापन झालेल्या राष्ट्रसंघ संघटनेमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर मानव अधिकाराच्या प्रचार व प्रसाराला व्यासपीठ उपलब्ध झाले. हिटलर आणि मुसोलिनी यांनी मानव अधिकारांच्या विकासात अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मानव अधिकारांच्या विकासक्रमात दूसरे महायुद्ध अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जाते. महायुद्धकाळात ग्रेट ब्रिटनचे पंतप्रधान विन्स्टन चर्चिल आणि अमेरिकेचे अध्यक्ष फ्रेन्कलिन रूझवेल्ट हे अटलांटिक महासागरात एकमेकांना भेटलं आणि त्यांनी एक संयुक्त घोषणापत्र जाहीर केले हे घोषणापत्र 'अटलाटिक सनद' नावाने ओळखले जाते या घोषणापत्रात मानव अधिकारासंदर्भात काही तत्त्वाचा उल्लेख करून आशादायी व शांततापूर्ण सहअस्तित्व असलेल्या जगाचे स्वप्न रंगविण्यात आलेले होते महायुद्धकाळात पडलेल्या नरसंहार, वित्तहानीतून मानव अधिकारांची परत विस्ताराने आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चा होऊ लागलो अमेरिकेचे अध्यक्ष फ्रैकलीन रूझवेल्ट यांनी चार मूलभूत अधिकार आणि स्वातंत्र्याची घोषणा केली. २५ जून १९४५ रोजी सनफेन्सिकोच्या सहाव्या संमेलनात जनरल स्मटनी मानव अधिकाराची भूमिका मांडणारा प्रस्ताव मांडला. २४ ऑक्टोबर १९४५ रोजी संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना झाली संयुक्त राष्ट्र संघाच्या स्थापनेनंतर मानव अधिकाराला वैश्विक मान्यता मिळाली. संयुक्त राष्ट्र संघटनेने स्थापन केलेल्या एलिनॉर रूझवेल्ट आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार १० डिसेबर १९४८ रोजी मानवी हक्कांचा जाहीरनामा प्रसिद्ध केला त्यात ३० मानवी हक्काचा समावेश होता मानवी हक्कांचा जाहीरनामा युनोच्या आमसभेत मांडण्यात आला आमसभेने मानवी हक्क सनदेला स्वीकृत करून १० डिसेंबर १९५० ला दिली. सनदेला आमसभेतील ५८ राष्ट्रांनी एकमुखाने मान्यता दिली मानव अधिकार जाहीरनामा १० डिसेबर घोषित करण्यात आल्यामुळे हा दिवस मानव अधिकार दिन म्हणून जगभर साजरा केला जातो. युनोच्या घोषणापत्रानुसार प्रत्येक राष्ट्राने मानव अधिकाराचे रक्षण करण्यासाठी मानव अधिकार आयोगाची स्थापना करावी, अशी विनंती केली त्यासाठी युनोने १९७८ जिनेव्हा येथे एक कार्यशाळा आयोजित करून जिनिव्हा संमेलनात एक ठराव संमत करण्यात आला. पंतप्रधान पो व्ही नरसिंहरावच्या काळात सर्व मुख्यमंत्र्याच्या संमेलनात चर्चा होऊन आयोग करण्यास तत्वतः मान्यता दिली. भारत सरकारने १४ मे १९९२ मध्ये मानव हक्क आयोग कायदाचा मसुदा लोकसभेत सादर केला. भारत सरकारने २७ सप्टेंबर १९९३ रोजी 'राष्ट्रीय आयोग व राज्य मानवी हक्क आयोग' स्थापन करण्यासाठी वटहुकूम काढला. त्या वटहुकूमानुसार १२ ऑक्टोबर १९९३ रोजी राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाची स्थापना करण्यात आली. संसदेच्या दोन्ही सभागृहानो वटहुकूमात काही सुधारणा करून मंजुरी प्रदान केली ८

जानेवारी १९९४ रोजी राष्ट्रपतीच्या संमतीनंतर मानव हक्क संरक्षण कायदा प्रत्यक्षात अंमलात आला.

वैश्विक मानव अधिकार घोषणापत्र १९४८ – १० डिसेंबर १९४८ रोजी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने मानवी हक्कांचा वैश्विक जाहीरनामा घोषित करून स्वीकारला. जाहीरनामा घोषित करण्यामागे अधिकारांचे संहितीकरण करून आंतरराष्ट्रीय समुदायाची राजकीय वैधता प्राप्त करणे हे मुख्य उद्दिष्ट होते. युनोने १९४६ मध्ये मानवी हक्क आयोगाची स्थापना केली. स्थापनेच्या वेळेस आयोगाचे ५३ राष्ट्र सदस्य होते. सदस्य राष्ट्रामधील मानव अधिकाराचे अवलोकन करणे, हक्कांबाबत जाणीव जागृती निर्माण करणे, महिला, बालके आणि युद्धकैद्यांच्या अधिकाराविषयी आंतरराष्ट्रीय समुदायास संवेदनशील बनविणे या व्यापक उद्देशाने हा आयोग स्थापन करण्यात आला या जाहीरनाम्यानुसार युनोने सदस्य राष्ट्रांना आव्हान केले की, राष्ट्राची राजकीय परिस्थिती कशी ही असली तरी आप–आपल्या देशातील शाळा आणि शैणिक संस्थात मानव अधिकाराचे व्यापक प्रदर्शन वा प्रचार करावा. मानव आपल्या पुढील पिढीला युद्धाच्या दुष्परिणामापासून वाचवेल. मूलभूत मानव अधिकारावर आपली आस्था व्यक्त करून व्यापक स्वातंत्र्य आणि जीवन स्तर सुधारण्यासाठी सामाजिक प्रगतीला प्रोत्साहन देईल. मानव अधिकार घोषणापत्र व्यापक स्वरूपाचे असून मानवी जीवनाकरिता महत्वपूर्ण अशा ३० अधिकाराचा समावेश आहे. १० डिसेंबर हा जागतिक मानव अधिकार दिन म्हणून साजरा केला जातो. घोषणापत्राच्या प्रस्तावनेत सर्व मानवाच्या स्वाभाविक प्रतिष्ठा समानता आणि प्राकृतिक अधिकाराना मान्यता देऊन विश्वात स्वतंत्र्यता, न्याय आणि शांतता स्थापन करता येईल. मानव अधिकाराच्या उल्लंघनाच्या अनेक अमानुष घटना उघकिस आलेल्या आहेत ज्यामुळे मानवाचा आंतर आत्मा जागा झालेला आहे. सर्व मानवाना प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी आवश्यक महत्वपूर्ण अशा अधिकाराचा समावेश घोषणापत्रात केलेला आहे. मानव अधिकार घोषणापत्रात समाविष्ट ३० हक्कांचे सकारात्मक आणि नकारात्मक हक्क असे वर्गीकरण स्थूलमानाने केले जाते नकारात्मक अधिकारांच्या माध्यमातून राष्ट्रांना काही कृत्ये करण्यास प्रतिबंध लादलेले आहेत तर सकारात्मक हक्कांच्या माध्यमातून हक्क उपभोगास आवश्यक सुविधा राष्ट्रांनी निर्माण कराव्यात यावर भर दिलेला आहे.

मानव अधिकार घोषणापत्रातील तरतुदी वा कलमे –

१.कलम १ व २ मध्ये सर्व व्यक्ती जन्मतः स्वतंत्र आणि समान आहेत मानवाला विवेकशील प्राणी मानुन त्यांची प्रतिष्ठा, स्वतंत्र्यता, समानता, बंधुभावाला महत्व दिले आहे. जात, वर्ण, लिंग, भाषा, धर्म, राजनीतिक विचारधारा, संपत्ती व जन्म इ. आधारावर कोणताही भेदाभेद केला जाऊ नये.

२.कलम ३, ४, ५ मध्ये प्रत्येक व्यक्तीला जीवन, स्वातंत्र्याचा आणि सुरक्षेचा अधिकार देऊन त्याबरोबर कुणालाही गुलाम बनविता येणार नाही गुलामांच्या व्यापारावर प्रतिबंध लादण्यात आलेला आहे. अमानवी, अमानुष वागणूक व छळावर बंदी लादलेली आहे. कोणत्याही व्यक्तीसोबत क्रूर व अमानवी वा अपमानजनक व्यवहार करणार येणार नाही.

३.कलम ६ ते ११ नुसार कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान आहेत कायदया समोर समानता आणि कायदयाचे समान संरक्षण तसंच कायदेशीर संरक्षणाची प्रत्येकाला हमी दिली आहे. बेकायदेशीर अटकेवर प्रतिबंध लादला असून कोणावरही आरोप लागू केल्यानंतर योग्य कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करावा मनमानी अटक, केदेपासून मुक्ततेचा अधिकार बहाल करून निःपक्ष न्याय मिळविण्याचा अधिकार बहाल केलेला आहे. जोपर्यंत आरोप सिद्ध होत नाही तोपर्यंत व्यक्तीला निदोष मानले पाहिजे

४.कलम १२ मध्ये व्यक्तीच्या खाजगी वा वैयक्तिक सुरक्षेसाठी व्यक्तीचे घर, परिवार व पत्र ३. अकारण हस्तक्षेपाचा निषेध केलेला आहे कौटुंबिक आयुष्यातील मनमानी हस्तक्षेपासून मुक्ततेचा प्रयत्न केलेला आहे.

५.कलम १३ व १४ नुसार कोणत्याही देशाने येण्या–जाण्याचा, संचार आणि वास्तव्य स्वातंत्र्याचा अधिकार दयावा. अन्यायापासून संरक्षणासाठी विदेशात शरण घेण्याचा अधिकार देण्यात आला. इतर राष्ट्रांमध्ये निर्वासित म्हणून राहण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

६.कलम १५ मध्ये राष्ट्रीयत्वाचा अधिकार बहाल केलेला

आहे.

७.कलम १६ मध्ये परस्परांच्या संमतीने विवाह करण्याचा आणि परिवार निर्माण करण्याचा अधिकार दिलेले आहे

८. कलम १७ मध्ये संपत्तीचा अधिकार मान्य केलेला आहे. प्रत्येक व्यक्तीला मालमत्तेचे जतन, संवर्धन आणि उपभोगाचा अधिकार मान्य केलेला आहे.

९. कलम १८ मध्ये विचार आणि अभिव्यक्ति स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार मान्य केलेला दिसतो.

१०. कलम १९ मध्ये आपले सर्वासमोर व्यक्त करण्यासाठी भाषण स्वातंत्र्याचा अधिकार दिलेला आहे.

११. कलम २० मध्ये शांतिपूर्ण सभा घेण्याचा वा संघटना स्थापन करण्याच्या स्वातंत्र्याचा समावेश आहे

१२. कलम २१ मध्ये आपला प्रतिनिधी निवडणे आणि त्या माध्यतातून देशाच्या शासनव्यवस्थेत भाग घेण्याचा व सार्वजनिक पदप्राप्तीचा अधिकार त्यासाठी सार्वजनिक मताधिकार समर्थन केलेले आहे

१३. कलम २२ ते २६ मध्ये व्यक्तीच्या सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी आवश्यक अधिकाराचा समावेश केलेला आहे. व्यक्तीच्या संकटकाळात सामाजिक सुरक्षेचा अधिकार, रोजगाराचा अधिकार. समान वेतन, विश्रांतीचा अधिकार, व्यक्तीला आरोग्य आणि कुटुंबानुरूप सन्मानपूर्वक जीवनस्तराचा अधिकार, माता आणि बालकाची देखरेख व शिक्षणाचा अधिकार इ. चा समावेश आहे.

१४. कलम २७ मध्ये सांस्कृतिक जीवनात, कार्यामध्ये सहभागाचा अधिकार दिलेला दिसतो.

१५. कलम २८ मध्ये मानव अधिकार उपभोगण्यासाठी सामाजिक आणि आंतरराष्ट्रीय रचनेच्या निर्मितीचा अधिकार दिला आहे तसेचमानवी अधिकार आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करुन देणे.

१६. कलम २९ व ३० नुसार समाजाप्रति व्यक्तीच्या कर्तव्यावर भर दिलेला आहे. कर्तव्यपालन केल्यास व्यक्तीचा संपूर्ण विकास शक्य आहे. लोकतांत्रिक समाजात सर्व व्यक्तीना समान अधिकार आणि स्वातंत्र्य देणे सामान्य व्यवस्था वा हितारिता व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर तर्कसंगत प्रतिबंध लादण्याचा अधिकार राज्यांना असेल.

–९८२२२३३७९२

## शैक्षणिक विशेष... शिक्षण विभाग वगळता अन्य विभागांची कामे शिक्षकांना नको...

शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या अशैक्षणिक कामांसंदर्भात राज्य सरकारने नियुक्त केलेल्या समितीने आपला अहवाल सादर केला आहे. त्यानुसार राज्यातील शिक्षकांना शिक्षण विभाग सोडून अन्य विभागांची कोणतीही कामे देऊ नयेत, शालेय पोषण आहाराच्या अभिलेख्यांच्या कामासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करावी, अशा महत्त्वाच्या शिफारशी अहवालाद्वारे करण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता या अहवालासंदर्भात शिक्षण विभाग काय धोरण निश्चित करणार, ही बाब महत्त्वाची ठरणार आहे.

शिक्षण हक्क कायद्यातील कलम २७ नुसार शिक्षकांना अशैक्षणिक कामे लावण्यास परवानगी नाही. राष्ट्रीय दशवार्षिक जनगणना, निवडणूक आणि नैसर्गिक आपत्तीच्या वेळीच शिक्षकांना कामे देता येतात. मात्र शिक्षकांना वर्गात शिकवणे किंवा शैक्षणिक उपक्रमांव्यतिरिक्त जवळपास दिडशे कामे लावली जात असल्याचा आक्षेप आहे. त्यात प्रशासनाने दिलेली विविध कामे, अहवाल, सर्वेक्षणे, अभियाने आदींचा समावेश आहे. मात्र या अशैक्षणिक कामांमुळे शैक्षणिक कामकाजावर परिणाम होत असल्याचे सांगत शिक्षक संघटनांकडून या कामांना विरोध करण्यात आला आहे. त्यामुळेच नवसाक्षरता अभियानातील निरक्षरांच्या सर्वेक्षणावरही शिक्षक संघटनांनी बहिष्कार घातला आहे.

परिणामी या अभियानाचे काम पूर्ण क्षमतेने सुरू झालेले नाही. या पार्श्वभूमीवर शिक्षकांच्या अशैक्षणिक कामांबाबत शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली होती. नुकत्याच झालेल्या विधिमंडळ अधिवेशनापूर्वी समितीने आपला अहवाल सादर केला. त्यात विविध शिफारशी करण्यात आल्या आहेत.

पुस्तकांची पाने चाळतांना...

# एक गोष्ट राजर्षी शाहूंची...



**विजय गायकवाड**
कोल्हापूर

करवीरच्या या पावन भूमीत कला पेरण्याचे –उगविण्याचे – तिला फुलविण्याचे थोर कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केल्यामुळेच या नगरीला 'कलानगरी' असे संबोधले जाते. महाराजांच्या औदार्याने व कलाकारांच्या उत्साहाने सर्व प्रकारच्या कला बहरात येऊन त्यांनी अक्षय कीर्ती संपादन केली.नाटक,गायन, चित्रकला या इतक्या फुलल्या की या कलांनी कोल्हापुराचे नाव देशभरात पोहोचविले,तर कुस्तीने तर मुकुटच चढविला. महाराजांची नजर शोधक असल्यामुळे ते अचूक व योग्य माणसांची निवड करण्यात निष्णात होते.आबालाल रहेमान अर्थात पेंटर यांची निवड अशीच केली गेली.जन्मतःच आबालाल यांना चित्रकलेचे अल्लाने दान दिले असले तरी त्यांचे श्रेष्ठत्व पारखून,त्या कोहिनूर हिऱ्याला उजेडात आणण्याचे व मार्गी लावण्याचे काम राजर्षींनी केले म्हणूनच आबालाल रहिमान सर्वांना कळले.आबालाल हे चित्रकलेच्या शिक्षणासाठी मुंबईला गेले होते.त्या ठिकाणी त्यांनी चित्रकलेत विशेष प्रावीण्य मिळविले. अशा या आबालाल यांच्यावर मुंबईत अन्याय झाला. चित्रकलेतील आपली सिद्धहस्तता जाणून त्यांचा विश्वास होता, की आपण परीक्षेत प्रथम येणार,पण प्रथम क्रमांक एका श्रीमंत व वशिल्याच्या मुलाला देण्यात आला व दुसरा क्रमांक आबालाल यांना देण्यात आला.या कृत्याने आबालाल यांचे मस्तक फिरले.यासाठी त्यांनी तत्कालीन परीक्षाप्रमुखांशी वादही घातला. त्याचा काडीचाही उपयोग झाला नाही.

निराश, नाराज, घायाळ झालेले आबालाल कोल्हापूरला परतले. अन्यायाचा आबालाल यांच्या मनावर विपरीत परिणाम झाला.ही घटना शाहू महाराजांना समजली. त्याच आबालालला आत्ताच आपण कार्यमग्न ठेवले तर कोल्हापूरचा हा चित्रकार या नगरीचे नाव लौकिकास नेईल, असा विचार करून त्याला बोलाविणे पाठविले.

'काय आबालाल, काय करतोस तरी काय?'

'जी, काही नाही.'

'काही नाही म्हणून कसे चालेल ? अरे,तू उत्तम कलाकार आहेस.काहीतरी केलेच पाहिजे, मेरी बात सच है या नहीं? तुम्हारे जैसे कलाकार हमारे राज्य की शान है।'

प्रत्यक्ष छत्रपतींनी आपल्या कलेची प्रशंसा केल्याबद्दल त्यांच्यात विश्वासाचा अंकुर फुटला. नाराज चेहऱ्यावर हळूच हास्याची लकेर उमटली. त्या जाणत्या राजाने त्या लकेरीची क्षणात पहचान घेतली व जवळ जात आबालाल यांच्या पाठीवर थाप मारून आत्मविश्वास जागविण्याचा प्रयत्न केला.आत्मविश्वास हे

कर्तृत्ववृक्षाचे मूळ आहे. वृक्षाची मुळे जो-जो भूमीत खोल जातात,तो-तो वादळाशी झुंज देण्यास तो समर्थ होतो,याची जाण महाराजांना असल्यामुळे त्यांनी शाब्दिक खतपाणी घालण्याचे काम चालू ठेवले.जसा तो फुलोरा फुलला हे महाराजांच्या ध्यानी आले,त्या वेळी त्यांनी आबालाल यांना सरकारी शाळेत चित्रकलेचा शिक्षक म्हणून काम करण्यास सांगितले.महाराजांची आज्ञा त्यांनी स्वीकारली.

आबालाल हे स्वतःच्या मनाचे राजे नव्हे तर सम्राटच होते.मनाला आले तर शाळेत काम करणार,नाही तर भ्रमंती करीत फिरणार याची जाण महाराजांना इतरांनी करून दिली होती. असे इतर लोक महाराजांना आबालाल यांना नोकरीतून काढून टाकण्यासंबंधीपण सुचवीत असत.महाराज अशा हुजऱ्या-मुजऱ्या- खूशमस्कऱ्यांवर कधीही विश्वास ठेवीत नसत. प्रत्येक बाबतीत अनुभवाला ते अधिक प्राधान्य देत.'अनुभव राहाणीविण कायसे श्रवण। गर्भअन्ध नेणे रत्नाकरण।। (ज्ञानदेव) असे त्यांचे मत होते.जीवनाचा साक्षात्कार स्वप्नाळू कल्पनेने कधीच होत नाही.जीवनाचे साफल्य नुसत्या गोड आभासातही होत नाही,ते कटू असलेल्या अनुभवातच होते.

एक दिवस महाराजांनी आपल्या खडखड्यातून सकाळी साधारणपणे ११ वाजता सोनतळीहून बाहेर पडून कोल्हापूरकडे प्रयाण केले. खडखड्यातून जाता जाता महाराज विचार करू लागले. आबालाल यांच्यासारखा जन्मजात कलाकार वाया जात आहे,याला काय करावयाचे? संपूर्ण जगताकडे जरी उत्तरे नसली तरी महाराजांच्याकडे प्रत्येक प्रश्नाला उत्तर होतेच. खडखड्यातून जाताना अचानक रस्त्याच्या कडेने आपल्याच धुंदीत हा आबालाल कलाकार जात असलेला महाराजांनी पाहिला. खडखडा थांबविला.

महाराज आबालाल म्हणाले,

अरेऽऽ आबालाल,कहाँ जा रहे हो? चलो, आओ, गाडी में बैठो।

महाराजांच्या हुकमाचा धनी बनून आबालाल न बोलता खडखड्यात बसले.खडखडा आज वेगाने गाववेशीच्या बाहेर कोठेही न थांबता सुटला.महाराजांचा जाणारा खडखडा आज वेगाने कोठे चालला आहे?याचा जनतेला प्रश्न पडला.जनतेला तरी याचे उत्तर कोठून माहीत असणार? सरळ खडखडा आला तो ज्या ठिकाणी बाज,बहिरी,लगड,शिकारी पक्ष्यांना पक्षी व प्राणी यांची शिकार कशी करावयाची असते याचे ट्रेनिंग दिले जात होते या ठिकाणी येऊन खडखडा थांबला.

इथे आल्यानंतर महाराजांच्या आज्ञेवरून बहिरी या पक्ष्याला आकाशात खूप उंचीवर उडविण्यात आले. त्या ठिकाणी तो स्थिर झाला. त्याने इतस्ततः पाहिले तर त्याला आपल्या खालून एक पक्षी जात असल्याचे दिसले.क्षणाचीही उसंत न घेता तीराप्रमाणे झेप घेऊन त्या बहिरी ससाण्याने पक्ष्याला जमिनीवर आणून लोळविले.बहिरी ससाण्याचा हा पराक्रम,ही झेप महाराजांनी अनेक वेळा पाहिली होती.

आबालाल यांना महाराज म्हणाले,इस शिकार का तू क्या चित्र निकाल सकता है?

क्षणात उत्तर दिले,क्यों नहीं महाराज!

महाराज एकदम प्रसन्न झाले.म्हणाले. व्वा! व्वा! मला वाटलंच होतं,तू निश्चित चित्र निकालेगा! अभी निकालेगा?

जरूर निकाल सकता हूँ,पर मेरे पास कागज, पेन्सिल नहीं।

तुम बैठो यहाँ,तुला हवे ते सर्व आणून देतो.

महाराजांनी तिथे असलेल्या एका घोडेस्वाराला पाठवून हवे ते साहित्य मागवून घेतले.चित्र काढण्यासाठी आबालाल त्या ठिकाणी बसले. चित्र पूर्ण होण्यास बराच वेळ लागणार,हे जाणून त्याची खाण्यापिण्याची व्यवस्था करून महाराज निघून गेले. (शाहूंच्या आठवणी, प्रा. नानासाहेब साळुंखे, वृषाली प्रकाशन,कोल्हापूर)

आज आबालाल यांची अशी चित्रे जी पाहावयास मिळतात ती महाराजांनी अशा प्रकारे काढून घेतली. तसेच आबालाल यांची पंचगंगेच्या काठावरची देवळांची, निसर्गसौंदर्याची चित्रे दिसतात तीही महाराजांनी प्रत्यक्ष नेऊन वरीलप्रमाणे काढावयास लावली.आबालाल यांच्यासारख्या महान कलाकार जो वाया चाललेला होता,त्याला त्यांनी उभा केला, फुलविला व त्यांच्या हसऱ्या कलेचे सौंदर्य पाहून आपण आजही म्हणतो,व्वा! आबालाल,तुम कोल्हापूर की शान हो।'' पण या 'शान'च्या मागे शाहू महाराज होते ना!


-९५५२१७७४७४

दखल

# सेवाव्रती



**डॉ.अतुल बडगुजर**
शिरपुर जि.धुळे


डॉ.संजीव खोसला


डॉ.शरत मेनन

**मा**झं कुटूंब तसं सर्वसाधारण. आई वडील दोन भाऊ तीन बहिणी अशा पंचकोनी कुटूंबात माझा जन्म झालेला. वडीलांची वडिलोपार्जीत थोडीफार शेती आणि बाजारपेठेत हॉटेलवजा छोटेखानी नाश्त्याचे दुकान. यावरच कुटूंबाची गुजरान व्हायची. आवक खूप नसली तरी जे काही यायचे त्यावर ८ वडील आई घराचा गाडा हाकायचे. कधी कुरकूर नाही कि वाद नाही. असा शांत सुखी परिवार होता आमचा. वडिलांचा सर्व भावंडानी शिकून मोठे व्हावे असा सतत आग्रह असायचा. त्यातल्या त्यात मी शिकुन डॉक्टर व्हावे असा त्यांचा नेहमीच होरा असायचा. वडिलांचं स्वप्नच होतं मला डॉक्टर बनवण्याचं. म्हणून माझ्या शिक्षणाकडे त्यांचे अधिक लक्ष असायचे.

माझं प्राथमिक शिक्षण यशवंत प्राथ.विद्यामंदिरात झाले. संस्कारसंपन्न बालके घडवणारी अशी ती शाळा होती. मनाचे श्लोक पाठांतर स्पर्धात मी नेहमीच अव्वल असायचो आणि याच संस्कारांनी माझे जीवन समृध्द केले. पुढील शिक्षण पी.बी.एम. हायस्कूल या शाळेत (आठवीपर्यंत) झाले. शहरातील मध्यवर्ती भागात ही शाळा. याच शाळेत अभ्यासाबरोबर मैदानी खेळाची ही आवड लागली. मित्रांबरोबर हुल्लडबाजी देखील वाढली.

तसा मी लहापणापासून हुशार होतोच. पहिल्या एक- दोन नंबराने माझी पाठ कधी सोडली नाही. माझे मित्र देखील (मनोज अग्रवाल, मनिष मित्तल, उमेश देसले, स्व.नितीन पाटील, स्व.सीमा पाटील, वीणा बिऱ्हाडे) मला नेहमीच ‘प्रोत्साहन द्यायचे. सतत माझ्या सोबत असायचे. शाळेतील मुलांमधला अवखळपणा माझ्याशी अंगी होताच. म्हणूनच अवखळपणा पाहुन वडिलांनी मला जळगावला मावशीकडे शिकण्यासाठी पाठवले. जळगावला भगीरथ इंग्लीश मेडीयम या शाळेत दाखल झालो. माझं शिक्षणाचं माध्यम मराठीच होते. ग्रामीण भागातून आलेला मी अभ्यासात तसा चुणचुणीत होतो. शालेय जीवनात नेतृत्वगुणाचा झालेला विकास आजही कायम राहिलाय. प्राथमिक माध्यमिक शिक्षणावेळी

प्रत्येक वर्षी ऑनेटरची भुमिका माझीच असायची. आठवी नववीला मॉनेटर निवडण्यासाठी निवडणूक घेतली जायची. नकळतच लोकशाहीची मुल्य अंगात रूजायला मदत झाली.

जळगावला असतांना अकरावी बारावीसाठी एम.जे.कॉलेजला विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. वडिलांची माझ्याकडे विशेष नजर होतीच. ते मला 'डॉक्टर बनायंच आहे' याची आठवण सतत देत असायचे. अकरावी बारावीला झोकून अभ्यास केला. रात्र पहाट काहीच पाहिले नाही. कारण बारावीच्या निकालावरच वैद्यकिय प्रवेशाचा मार्ग ठरणार होता. अभ्यासाबरोबर खेळ, नाटके सांस्कृतिक कार्यक्रम याचाही आनंद घेत होतो शेवटी बारावीचा टप्पा यशस्वीरित्या पार केल्यानंतर वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशाची धडपड सुरु झाली.

त्याकाळी वैद्यकीय प्रवेशासाठी सीईटी वगैरे नव्हती. बारावीच्या गुणांवरच प्रवेश मिळायचा. मात्र त्यासाठी सर्वच वैद्यकीय महाविद्यालयांना जाणून स्वत: अर्ज करावा लागत असे. वास्तविक माझे गुणानुसार एमबीबीएस ला प्रवेश मिळणार नसला तरी बीएएमएस चा प्रवेश निश्चित होता.

माझे आजोबा स्वातंत्र्य सैनिक होते. त्यांचा माझ्यावर विशेष लोभ होता. ते आणि मी दोघेजण मिळून महाराष्ट्रभर फिरलो. सर्वच वैद्यकीय कॉलेजला जावून फॉर्म भरले. आजोबा स्वातंत्र्य सैनिक असल्याने तिकीटाचा भार नव्हता. फक्त धावपळ होती. एकदा तर नागपूरहून मुंबई गाठतांना केलेली कसरत आजही आठवते. डॉक्टरकीचे शिक्षण मुंबई पुण्यासारख्या मोठ्या शहरात घ्यावे अशी मनात इच्छा होती. मात्र आर्थिक भार सहन होणार नव्हता. शेवटी शासकीय कोट्यातून धुळे येथील सुरुपसिंग नाईक. वैद्ययकिय महाविद्यालयात प्रवेश मिळाला. एका वर्षाची फी साडे चार हजार रुपये मात्र. साडे चार वर्षाचे बी.ए.एम.एस. केल्यानंतर मी डॉक्टर होणार म्हणून वडिल आनंदात होते. त्यांचे स्वप्न पूर्ण झाले होते.

मी वसतीगृहात न रहाता धुळे शहरातच, मुलांबरोबर खोली करुन रहात होतो. माझ्यासोबत मराठवाडा, विदर्भ, प.महाराष्ट्रातील मुले शिक्षणाला होती. मी मुळचा धुळे जिल्ह्यांतील म्हणून माझा रुबाब असायचा. लीडरशीप अंगात मुरलेलीच होती. कुठलेही प्रश्न, समस्या मांडण्यासाठी मी पुढेच असायचो. कॉलेज प्रशासना विरोधात नेहमीच मांड ठोकायचो.

एकदा उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या धोरणांविरोधात आम्ही मुलांनी आंदोलन करायचे ठरवले. आमच्यासोबत इतरही कॉलेजचे विद्यार्थी होते. संतोषी माता चौक धुळे येथे आंदोलन होणार होते. सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदन दिले जाणार होते. तशी माहिती पोलीस प्रशासनाला दिलेली होती. मात्र त्याच दिवशी तत्कालिन गृहमंत्री शरद पवार यांचाही दौरा होता. नेमका आमच्या आंदोलनावेळी ते याच मार्गाने जाणार होते. तेव्हा पोलीस प्रशासनाने आम्ही त्यांचा मार्ग अडवतोच या भितीने आम्हाला अक्षरश: बखोटे धरुन उचलले. त्यावेळी झालेले हाल आजही अंगावर काटा आणतात.

बी.ए.एम.एस चे विषय संस्कृतमधून असायचे. पहिल्या वर्षी संस्कृत भाषा शिकावी लागली. कारण ऋषीमुनींनी लिहिलेल्या ग्रंथाचा आर्युवेदाचा अभ्यास करण्यासाठी संस्कृतचे धडे गिरवावे लागले. श्लोक पाठांतर करावे लागायचे. उपासणी सर संस्कृत शिकवायचे.

आयुर्वेदाचे शिक्षण घेतांना खूप मजा यायची.आम्ही आयुर्वेदाची आठ अंगे शिकलो होतो. त्यानुसारच सोबतच्या मुलांच्या शारिरीक बांध्यावरुन त्यांना चिडवायचो. नावे ठेवायचो.

ॲनॉटामी शरिरचनाशास्त्र शिकण्यावेळी मजा नि भिती असायची. मृत शरिराच्या माध्यमातून आम्हाला अवयवांची माहिती मिळायची. त्यावेळी सुरूवातीला भिती वाटायची. वास सहन व्हायचा नाही. हळूहळू सवय झाली प्रत्येक सत्रानंतर ओरल (तोंडी परिक्षा) व्हायची. तेंव्हा तर संस्कृत श्लोक म्हणतांना अनेकांची भंबेरी उडत असे.बीएएमएस ची चारही वर्ष विनाब्रेक यशस्वीरित्या पार केल्यानंतर डॉक्टरची डिग्री हातात आली. आणि पुढचा वैद्यकीय सेवेचा टप्पा सुरु झाला.

पदव्युत्तर शिक्षणापेक्षा माझा प्रॅक्टीसकडे ओढा होता. वैद्यकीय अनुभव घेणे गरजेचे होते. म्हणुन मी पुणे मुंबई येथे धर्मादाय दवाखान्यात प्रॅक्टीस सुरु केली होती. तेथे प्रत्येक

प्रकारचे रुग्ण हाताळायला मिळत होते.

विशेषत: माझ्या वैद्यकीय क्षेत्रातील गुरू म्हणावे तर शरद मेनन (बालरोग तज्ञ) डॉ.संजीव खोसला (एम.डी). या दोघांच्या पठडीत मी तयार झालो. रुग्णाला प्रत्यक्ष तपासल्यानंतरच उपचार करायचा, त्याच्या तक्रारींचं निदान करतांना ॲडमिट करण्याची घाई होता कामा नये, आपलं काय हे न पहाता पेशंटच काय? हे पहायचं पेशंटला आर्थिक भार न देता खरं काय ते सांगायचं. गोळया औषधांनी सुधारणा होत असेल तर ॲडमिटचा दुराग्रह कशाला? पेशटंला तपासण्यासाठी (आवश्यकता पाहून) रात्र पहाट पहायची नाही. हे आणि अशा कितीतरी समाजसेवेचे धडे मला डॉ.मेनन व डॉ.खोसला यांचेकडून मिळाले. लहान मुलांचे आजारपण हाताळण्याचे कौशल्य डॉ.मेनन यांनी दिले. लहान मुलांना काही सांगता येत नाही तेंव्हा बाळाच्या आईकडून मिळालेली माहिती आणि आपले वैद्यकिय ज्ञान याची सांगड घालण्याची जादू डॉ.मेनन यांचेकडून शिकायला मिळाली.

डॉ.मेनन व डॉ.खोसला यांनी वैद्यकीय क्षेत्रातले इथिक्स समजावत आपल्या मर्यादा, कुवत पाहूनच लक्ष्मण रेषा आखून घेण्याचा मोलाचा सल्ला दिला तो आजही लक्षात आहे.

शेवटी मुंबई पुण्याचा प्रॅक्टीसच्या जोरावर आपल्या गावात दवाखाना सुरु करण्याचे ठरवले. १४ मार्च २००१ याच्यांशी व्यंकटेश क्लिनीक नावाने दवाखाना सुरु केला. आणि गेली २५ वर्ष 'विना रुकावट' वैद्यकिय सेवा देण्याचा प्रयत्न सुरु आहे. येणाऱ्या रुग्णाचा स्तर, जात, धर्म न कधी पाहिला नाही. पहात नाही. गोळ्या औषधांचा खर्च देखील जास्त होणार नाही याकडे कटाक्ष असतो. माफक फी ठेयलीय. 'फी'चा आग्रही कधी धरला नाही. असले तर दे, नसले तर नंतर देईन पण संवाद असू दे यावर रुग्णसेवा सुरु आहे. रुग्णांचाही मला आशिर्वाद आहे. वास्ताविक मी ओपीडी किती रुग्णांची आहे कधी पहात नाही. तरी सांगावेसे वाटले, चिकनगुनिया सारख्या आजारावेळी एकाच दिवसात तीनशेच्या वर रुग्ण तपासले होते. रात्र पहाट हा विषयच नव्हता. कधीही रुग्ण आला तरी माझा दवाखाना हा हक्काचा ठरला आहे याचा मला देखील विशेष अभिमान आहे. माझी पत्नी डॉ. वृषालीच्या भक्कम साथीने वैदयकीय सेवेची ज़्योत तेवत राहिली आहे.

आता रुग्ण सेवेबरोबर समाजसेवेचाही वसा घेतलाय. भारतीय जनता पार्टी वैद्यकीय आघाडीचे (डॉक्टर सेलचे अध्यक्षपद भुषवतोय, बडगुजर समाज उपाध्यक्ष, चामुंडा माता मंदिर ट्रस्ट अध्यक्ष, हस्ती बँकेचे संचालक) अशा विविध संस्थांच्या माध्यमातून जेमल तेवढं चांगले कार्य करण्याचा प्रयत्न करतोच.

स्वत:साठी जगतांना व्यायाम, योगा याकडे भर देतो. शरीरसंपत्ती हाच छंद नि आवड जोपासलाच. वेळ मिळेल तसा सायकलींग करतो आणि सर्वात महत्त्वाचे माझ्या मुलाच्या तनिष्कच्या शिक्षणाकडे विशेषत: जो जोपासत असलेल्या चित्रकलेकडे लक्ष देतो. तो नुकताच बालभवन दिल्ली येथे जाऊन आला नि सुवर्ण पदकाचा मानकरी ठरलाय. पंचवीस वर्षाच्या वैद्यकीय समाजसेवेची आठवण सांगावशी वाटते. माझ्याकडे निमझरी ता.शिरपूर जि.धुळे येथील आदिवासी जमातीतील एक पालक आपल्या दोन लहान मुलांना नेहमीच आणतात. एकदा ते दोन्ही बालक आणि वडील आले होते. त्या दोघांची नावे पाहिली तेव्हां मला आश्चर्याचा धक्काच बसता. एका बाळाचे नाव होते. व्यंकटेश (जे माझ्या क्लिनीकचे नाव आहे) दुसऱ्या मुलाचे नाव होते अतुल (जे माझे स्वत:चे नाव) मी त्याला त्याबद्दल विचारले. तर तो नुसता हसला. त्याचे निष्पाप हास्य मला पंचवीस वर्षाच्या सेवेचा पुरस्कार देऊन गेला. समाधान देऊन गेला.

**(शब्दांकन –संदेश हजारे)**

**–९४२२७९३२७१**

भविष्य वेध !

# जागतिक दर्जाचे भविष्य वेधी शिक्षण विचार ...



**निलेश घुगे**
वाशिम

शिक्षण हे व्यक्तीविकासाचे साधन आहे. काळ बदलत जातो तसे शिक्षण पद्धतीमध्ये बदल करायला हवेतच. भविष्यामध्ये कोणते बदल होतील याचा अंदाज घेऊन व या बदलांना सामोरे जाण्यासाठी एक समर्थ व्यक्तिमत्व शिक्षणातून तयार व्हावे हे अपेक्षित असते. हे बदल स्वीकारणे हे आपल्या सर्वांसाठी अनिवार्य आहेत. तरच आपण या २१ व्या शतकात टिकून राहून आपली उपयोगिता सिद्ध करू शकू. विकसित राष्ट्र म्हणून आपली वाटचाल सुरु आहे यासाठी आपल्या शिक्षण पद्धतींमध्ये भविष्य काळाचा विचार करून योग्य ते बदल करणे काळाची गरज आहे. आपल्याला असे काही तंत्र, पद्धती, विचार विकसित करावे लागतील ज्यातून विद्यार्थ्यांचे शिंकणे सहज, सोपे व परिणामकारक होईल. झपाट्याने बदलणारे तंत्रज्ञान यामुळे जग खूप वेगाने बदलत आहे. तंत्रज्ञानामुळे जग खूप जवळ आले आहे.

शिकण्याच्या अनेक संधी घरबसल्या आता उपलब्ध होऊ लागल्या आहेत. २१ व्या शतकतील कौशल्य प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये विकसित व्हावीत यासाठी केवळ शिक्षकांनी शिकवणे एवढीच कृती आता पुरेसी ठरणार नाही. भविष्याचा विचार करता विध्यार्थ्यांमध्ये शिकण्याच्या बाबतीतही विद्यार्थी स्वतः कसे शिकू शकतील . शालेय जीवनापासून विद्यार्थी आत्मनिर्भर कसे होऊ शकतील याचा विचार शालेय शिक्षणात होणे गरजेचे आहे. शालेय शिक्षणातून मुले भविष्यासाठी तयार होणे गरजेचे आहे. जगाच्या बदलत्या गतीनुसार त्यांना अद्यावत होणे आवश्यक आहे. अद्यावत होण्यासाठी सतत मुलांना शिकत रहावे लागणार आहे. जर सतत शिकायचे असेल तर अध्ययन कौशल्य विकसित करणे आणि गतीने शिकणे या कौशल्यावर काम करावे लागेल. थोडक्यात काय तर UNISCO ने सांगितल्याप्रमाणे Learning To Learn शिकायचे कसे हे शिंकणे या कौशल्यावर काम आपल्याला शालेय शिक्षणातून करावे लागेल.

भविष्यवेधी शिक्षण पद्धतीमध्ये भविष्याचा विचार करून आधुनिक पद्धतीचा अवलंब केला आहे. त्यामुळे मनुष्य हा useless न राहता useful राहील याची शाश्वती भविष्यवेधी शिक्षण विचारामुळे मिळेल. भविष्यवेधीच्या पुढील चार आयमांची पूर्तता करून जागतिक पातळीवर

विकसित मुल घडू शकते हा विश्वास भविष्यवेधी शिक्षण विचारामुळे शिक्षकांना मिळू लागला आहे. भविष्य वेधी शिक्षण हे चार आयामावर काम करते . जगतील प्रत्येक मुल भविष्य वेधी शिक्षणाने घडू शकते .

१.असे मुल विकसित करणे ज्याला जागतिक दर्जाची स्वीकार्यता असेल.

२.असे व्यक्तित्व विकसित करणे जे भविष्यासाठी तयार असेल.

३.१००% मुलांच्या १००% क्षमतांचा उपयोग करणे.

४.PIS-RE-DY मुल तयार करणे.

हे आयाम वैश्विक आहेत.या चार आयामांची पूर्तता करण्यासाठी प्रत्येक शिक्षकाने वर्गपातळीवर भविष्यवेधी

शिक्षणाच्या सहा पायऱ्यावर स्व-पातळीवर काम केले तर मुल विकसित होऊ शकतात.

१.मुलांना स्वत: शिकण्यास प्रेरित करणे.

२.मुलांना शिकण्यास आव्हान देणे.

३.Learning Intervention ( Peer Learning, Group Learning amp; विषय मित्र)

४.मुलांच्या जिज्ञासू वृत्तीचा सन्मान करणे.

५.मुलांच्या शिकण्यात तंत्रज्ञानाचा उपयोग.

६.मुलांनी स्वत:च्या शिकण्याची गती तिप्पट करणे.

या सहा पायऱ्यांच्या अनुषंगाने कार्य केल्यास श्रम निम्म्यावर, परिणाम(यश) दुप्पट आणि आनंद तिप्पट मिळतो. याची परिणामकारकता आपल्याला शिक्षकांना मिळू शकते . मुलांना स्वत: शिकण्यास प्रेरित करण्यासाठी मुलांची आवड निवड लक्षात घेऊन त्यांच्या आवडीच्या कामापासून सुरुवात करावी. मुलांनी केलेल्या कामाचे वेळीच कौतुक करावे. मुलांच्या अंगी असलेल्या सुप्त कला गुणांना वाव देऊन त्यांना प्रेरित करणे.मुल हे स्वत: शिकू शकते हा विश्वास ठेवून मुलांमध्ये आत्म विश्वास निर्माण करणे. Selfie with Success च्या माध्यमातून मुलांना प्रेरित करणे. विद्यार्थ्यांची स्वयं अध्ययनाची गती वाढविण्यासाठी मुलांना शिकण्यास आव्हान देणे हि पायरी महत्वाची आहे.

मुलांना शिकण्या संदर्भात दिलेले आव्हान पूर्ण करण्यासाठी मुलांची चाललेली चढाओढ आणि आत्मविश्वास दृढ होऊन मुलांची शिकण्याची गती वाढते. आव्हाने सोडविताना मुलांच्या अंगी असलेले Critical thinking Am{U Creative thinking हि कौशल्य विकसित होतात. मुले Learning Intervention च्या माध्यमातून Peer Learning मध्ये आपल्या जोडीदार सोबत विचारांची देवाणघेवाण करून अतिशय मुक्तपणे समजून घेऊ शकते पडलेल्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर जोडीदारासोबत चर्चा करून



समजून घेऊ शकते.

या जोडीचे अनेक प्रकार आपण करू शकतो. मुलांच्या सोयीनुसार किंवा गरजेनुसार जोडी केल्यास त्यांचे शिकणे सहज घडतात. त्याच प्रमाणे गटात विद्यार्थ्यांचा परस्पर शिकण्याचा फायदा होतो. वेगवेगळ्या क्षमता किंवा संमिश्र गटात विद्यार्थी बसून प्रत्येक घटक समजून घेण्यास मदत होते. गटात काम करताना विद्यार्थी इतरांच्या मतांचा आदर करतात आणि सहकार्याची भावना वाढीस लागते. मुले हि मुलांकडून अधिक चांगल्या गतीने शिकू शकतात त्यांना जर काही शंका असतील तर ते निसंकोच पणे मुलांना विचारतात. त्यामुळे मुलांचे Collaboration, Communication amp; Compassion skill विकसित होतात.

शिक्षकांकडून शिकताना काही मर्यादा, बंधने येतात अशा वेळी संबंधित घटक न समजल्यास विषय मित्राची मदत होते. विषय मित्र हव्या त्या वेळी उपलब्ध होऊ शकतो. विषय मित्राकडून आपल्या बोलीभाषेत पण शिकता येते. विषय मित्र हा वर्गातील मुलांसाठी एक आधारस्तंभ असतो. Learning Intervention मध्ये मुलांना तणावमुक्त व आनंद युक्त वातावरणात शिकता येते. विद्यार्थ्यांच्या जिज्ञासू वृत्तीचा सन्मान करणे या पायरी मध्ये मुल आहे त्या स्थितीत त्याला स्वीकारले जाते. प्रत्येक मुलाला आदराची व सन्मानपूर्वक वागणूक दिली जाते. मुलाला पडलेल्या प्रश्नाची उत्तरे प्रत्यक्ष न देता स्वतःलाच उत्तर शोधण्यासाठी प्रेरित करणे म्हणजेच जिज्ञासा वाढविली जाते. या पायरीमध्ये विद्यार्थ्यांची कुतूहल पूर्ती होत असते यामुळेच त्यांचा आत्मविश्वास बळकट होतो. आजच्या आधुनिक युगात शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर अतिशय महत्वाचा आहे. आज शिक्षकाकडे असलेला ज्ञान साठा हा मर्यादित आहे त्यामुळे विद्यार्थी शिक्षकांवर अवलंबून न राहता तो स्वतः तंत्रज्ञानाच्या मदतीने अधिकची माहिती मिळवू शकतो. तसेच पाठ्यपुस्तकासोबतच इतरही बऱ्याच बाबी तो तंत्रज्ञानाच्या मदतीने शिकू शकतो. आज कुठलीही माहिती तंत्रज्ञानाच्या साह्याने मिळवून न थांबता पुढे शिकणे सुरु ठेऊ शकतात. शिक्षकांनी तंत्रज्ञानाचा उपयोग मुलांना शिकविण्यासाठी नाही तर शिकण्यासाठी केला तर मुलाचे शिकणे अधिक गतीने होते. एकविसाव्या शतकात अधिक सक्षमपणे वावरायचे असेल तर अधिकाधिक शिकावे लागणार आहे. त्याकरिता Learning to Learn हे कौशल्य मुलांना येणे अनिवार्य आहे. Learning to Learn हे कौशल्य मुलांना यायचे असेल तर Learning Skill विकसित होणे आवश्यक आहे. Learning Skill विकसित होण्यासाठी मुलांना अधिकाधिक संधी मुलांना द्यावी लागणार आहे . वरील पाच पायारांवर जर आपण काम केले तर मुलांची शिकण्याची गती तिप्पट होणार आहे. मुले अधिक गतीने शिकायला लागली तर मुलाचे पाठपुस्तक पण लवकर संपेल आणि उर्वरित अतिरिक्त वेळात त्यांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात शिकण्यास संधी मिळेल. वरील भाविष्यावेधीच्या या सहा पायऱ्या नुसार प्रत्यक्ष पडताळून बघितल्या आहेत यासाठी विद्यार्थ्यांसोबत काम करण्यात आले आहे. मिळालेल्या परिणामा नुसार असे लक्षात आले कि कमी कालावधीत या प्रक्रियेनुसार चांगला परिणाम मिळात आहे. या पद्धतीचा अवलंब करून १००% FLN ची प्रक्रिया पूर्ण होण्यास मदत होईल. प्रत्येक मुलाला जागतिक स्तरावर स्वीकार्यता प्राप्त करून देण्यासाठी आपण सार्वजण शाळा-शाळा मधून या भविष्यवेधी शिक्षणाचा अवलंब करणे गरजेचे आहे. भविष्यवेधी शिक्षणाचा परिणाम एवढ्यावरच न थांबता याची परिणामकारकता या भविष्यवेधी शिक्षण पद्धतीचा शिक्षण विभागाने स्वीकार करून संपूर्ण महाराष्ट्रातील शाळांमध्ये सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. संपूर्ण राज्यभर तालुकानिहाय शिक्षकांना प्रशिक्षण देणे सुरु आहे. या प्रशिक्षणाचे परिमाण भविष्यात निश्चित या प्रशिक्षणाचे परिणाम लवकरच आपल्याला शाळास्तरावर दिसून येतील.

**(श्री निलेश घुगे हे राज्य प्रशिक्षक ,महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद , मुंबई येथे कार्यरत)**

**-९७६४७१५९११**

भविष्य वेधी

# टाचा उंच करून वाट पहाणारा मुलगा आणि गुरूजींचं प्रशिक्षण



**युवराज माने**
सेलू-परभणी

शनिवार आमच्या आवडीचा! होय आवडीचाच. शनिवारी दप्तरमुक्त शाळा भरते आमची.या दिवशी आम्ही फक्त पुस्तकं वाचन करतो. ज्याला जे आवडेल ते करण्याची मुभा दिलेली असते. वीणा गवाणकर यांचं ' किमयागार ' पुस्तकाचं वाचन सुरू होत ;वाचताना मी मध्येच थांबलो आणि लेकरांना म्हणालो, बाळांनो,आता मी सोमवारपासून पुढे पाच दिवस प्रशिक्षणास जात आहे.मला शाळेवर येण्यास जमणार नाही. असं म्हणताच सर्व वर्ग शांत झाला. लेकरं बारीक चेहरे करून माझ्याकडे पाहू लागले. कल्याणी हळू आवाजात म्हणाली,गुरुजी, आता पाच दिवस नसणार तुम्ही, आम्हाला करमत नाही हो तुम्ही नसल्यास. असं कल्याणी म्हणताच ईश्वरी, ममता दिव्या, कोमल, सचिन , मनीषा, शीतल व स्वाती उठून उभे राहिले आणि म्हणू लागले, गुरुजी ,तुम्ही नका जाऊ दुसऱ्या गुरुजींना जाऊ द्या. आता सर्वच लेकरं यांच्या सुरात सूर मिळवत म्हणू लागले,तुम्ही शाळेत नसलात की आम्हाला मजा येत नाही, आम्हाला करमत नाही, तुम्ही नका जाऊ. लेकरांच्या तोंडून बाहेर पडणाऱ्या या प्रेमळ वाक्यांनी मी न्हावून निघालो.......

गुरुजी, जावंचं लागतं काहो प्रशिक्षणास?, स्वाती म्हणाली. मी लेकरांना समजून सांगू लागलो तर मलाच प्रश्नावर प्रश्न विचारू लागले.

काय असतं तिथं?

कोण शिकवतं तुम्हाला?

तुम्ही तर गुरूजी आहात आता तुम्हाला काय गरज शिकण्याची? असे कितीतरी प्रश्न लेकरं विचारू लागले. लेकरांना किती कुतूहल असतं अन् जाणून घेण्याची ओढ असते.

अगदी पहिल्या वर्गापासूनच या लेकरांच्या डोक्यात मी जाणिवांच्या बिया पेरल्या आहेत. त्यामुळे त्यांना या गोष्टींची जाणीव आहे. लेकरांच्या प्रश्नांना उत्तर देणं अपेक्षित होतं. मी म्हणालो, बाळांनो, निसर्गात प्रत्येक गोष्ट काळानुरूप स्वतः त बदल करून घेत असते.हा नियम आहे. तसच मी गुरुजी म्हणून मला नवं नवं काहीतरी शिकण्याची गरज आहे. स्वतला अद्यावत करण्याची गरज आहे. त्यासाठीच हे प्रशिक्षण आहे. म्हणून मी पाच दिवस तिथं जाणार आहे. आणि हो, मी तिथं माझ्यासाठी नाहीतर तुमच्यासाठी पण जाणार आहे.असं

म्हणताच प्रतिक म्हणाला, आमच्यासाठी, ते कसं काय गुरुजी?

लेकरांना पडणारी प्रश्न आणि त्यांची हवी असलेली उत्तर ही माझ्यासाठी खूप मोठी आनंदाची गोष्ट आहे. मी म्हणालो, प्रशिक्षण घेवून आलो की सांगतो. मी तालुक्याच्या गावी पाच दिवस प्रशिक्षण घेत असताना मलाही लेकरांची प्रत्येक प्रसंगात आठवण येत होती. आमचे सुलभक खूप छान पद्धतीने आम्हाला भविष्यवेधी शिक्षण रचना व गुरुजींनी स्वतः मध्ये करायचा बदल सांगत होते.यादरम्यान मात्र मला माझ्या बालपणातील एक गोष्ट सतत सतत आठवत होती.दररोज ती गोष्ट डोळ्यासमोर येत होती. त्या गोष्टीचा आणि या प्रशिक्षणाचा अगदी जुळणारा धागा म्हणजे वडील आणि मी.......

माझ्या बालपणातील ही गोष्ट.आमच्या गावचा बाजार तालुक्याच्या ठिकाणी भरायचा.दर मंगळवारी बाजार असायचा. मी प्रत्येक मंगळवारची आतुरतेने वाट पहायचो.आमच्या गावच्या बाजूला तालुक्याच्या दिशेने येणाऱ्या रस्त्याकडे मोठी टेकडी होती. बाजाराची दिवशी मी शाळा सुटली की त्या टेकडीवर जायचो. तिथं उभे राहून वडिलांची वाट बघायचो. टेकडीवर उभा राहूनही पायाच्या टाचा उंच करून माझे वडील कधी येतील याची वाट पाहत असायचो. पुन्हा पुन्हा टाचा उंच करून त्या रस्त्याकडे पहायचो. वडील दिसले की उड्या मारतात पळत सुटायचो. माझे वडील बाजाराला जायचे तर प्रत्येक बाजारी माझ्यासाठी काही ना काहीतरी घेवून यायचे.मी अगदी




ठवून या पाच दिवसात मी खूप काही जमा करून माझ्या लेकरांसाठी घेवून जातोय... मलाही उत्सुकता लागली आहे की, मी कधी एकदा शाळेत जाईन आणि माझ्या लेकरांना मी त्यांच्यासाठी काय काय आणले आहे हे सांगण्याची.

माझ्या शाळेतील लेकरं अशीच माझी आतुरतेने वाट बघत असतील का? आमचे गुरुजी तालुक्याच्या गावी गेले आहेत तर आमच्यासाठी काहीतरी नवं आणतील का? पाच दिवस आम्हाला सोडून गेले आहेत तर नक्कीच मोठ मोठ्या पिशव्या भरून आमच्यासाठी काहीतरी आणतील असं त्यांना वाटत असेल का? कल्याणी, खुशी, साक्षी, आरून, निशा, अश्विनी, साधना, आकाश, आयशा माझ्याही येण्याची वाट आपल्या पायांच्या टाचा उंच करून शाळेकडे येणाऱ्या रस्त्याकडे पहात असतील का?

**(युवराज माने हे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पारडी ता सेलू जिल्हा परभणी येथे कार्यरत)**

**-७५१७४७८५७०**

## शैक्षणिक विशेष... मूकबधिर विद्यार्थ्यांना 'हायटेक' शिक्षण, राज्यातील पहिला प्रयोग अकोल्यात

मूकबधिर विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे सोयीस्कर होण्याच्या दृष्टीने अत्याधुनिक प्रणालीचा वापर केला जाणार आहे. पहिली ते सातवीच्या मूकबधिर विद्यार्थ्यांना विविध विषय 'डिजिटल' माध्यमातून शिकण्यासाठी 'सॉफ्टवेअर' व 'टॅब' येथील शासकीय मूकबधिर विद्यालयात करण्यात आला. त्यामुळे ही शाळा आता महाराष्ट्रातील पहिली 'डिजिटल' साहित्य समावेशक शासकीय मूकबधिर विद्यालय ठरले आहे. हे कर्णबधिरांसाठी भारतातील पहिले बहुभाषिक सॉफ्टवेअर आहे. ते भारतीय सांकेतिक भाषेत शिक्षण, इंटरनेटवरील माहिती व अध्ययनाला सहायक आहे. या सुविधेमुळे विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या पद्धतीने शिकता येणार आहे. 'लर्न एण्ड एम्पॉवर'ने हे सॉफ्टवेअर विकसित केले आहे. या संशोधनाला रोजगार व उद्योजकता विकास विभागाच्या महाराष्ट्र स्टार्टअप यात्रेत पारितोषिक मिळाले आहे.

# आठवणीतले गुरूजी ... ना.का.साठे !



सी.डी.पाटील
शिरपूर-धुळे



साठे गुरूजी

दोंडाईचा येथील सोद्धारक विद्यार्थी संस्थेचे डी. आर.बी. ओ.डी हायस्कूल मध्ये सन १९८५ ते १९९२ या कालावधीत शालेय शिक्षण घेत असतांना संस्कृत विषयाच्या माध्यमातून विद्यालयाचे मुख्याध्यापक स्व. नारायण काशिनाथ साठे यांचे जवळपास सहा वर्षे मार्गदर्शन लाभले.या सहा वर्षांच्या कालावधीत सरांच्या अंगीभूत असलेल्या विविध कला आज शिक्षक म्हणून कार्य करीत असतांना पदोपदी आठवतात.त्यांची शिस्त, विद्यार्थी प्रियता, प्रत्येकाला नावानिशी ओळखण्याचे कौशल्य, संस्कृत विषयाचे मार्गदर्शन या सर्व गोष्टी आठवून स्व.ना.का.साठे सरांच्या आठवणीने डोळे पाणावतात.

आमच्या शाळेत प्रत्येक इयत्तेच्या पाच तुकड्या होत्या. आमच्या सरांनी प्रत्येक तुकडीतील संस्कृत विषयात प्रथम पाच येणाऱ्या विद्यार्थ्यांचे संस्कृत मंडळ स्थापन केले होते.या संस्कृत मंडळात आम्ही पंचवीस मुले होतो.

संस्कृत मंडळाचा विशेष वर्ग रविवारी चालवला जायचा.रविवारी सरांनी दिलेली वेळ कोणीही टाळायची नाही अन्यथा उशिरा येणाऱ्या विद्यार्थ्यांना दोन रुपये दंड भरणे अनिवार्य होते.एक तर वेळेआधी या,अन्यथा दंड भरा.दंड भरल्याशिवाय विशेष वर्गात बसता येणार नाही हा साठे सरांचा अलिखीत नियम होता. सर मुख्याध्यापक असूनही वेळेआधीच हजर होणे हे नित्याचेच. रविवारी चालणाऱ्या वर्गात सर शिकवत असतांना कोणी बोललेच तर शिक्षा फक्त एकच, त्या दिवसाच्या वर्गात बसण्याचे भाग्य नसायचे.सर बोलणाऱ्या विद्यार्थ्यावर एक कटाक्ष टाकायचे बोलणाऱ्या मुलाने गुपचूप उठून वर्गाबाहेर पडायचे.संस्कृत मंडळाचा एक तास चालणाऱ्या विशेष वर्गात संस्कृत विषयाची आवड निर्माण होण्याबरोबरच विविध श्लोक, सुभाषिते, संस्कृत गीते वदवून घेणे,पाठांतर करून घेणे.श्लोक, सुभाषिते यांचा अर्थ समजावून देण्याबरोबरच लिखाण करणे आदी गोष्टी सर आमच्या कडून करून घेत. सर निश्चितच संस्कृत पंडीत होते.

सरांनी वर्षभरात जमा झालेल्या दंडाच्या रक्कमेतून आम्हा

पंचवीस मुलांची वर्षा सहल नवापूर तालुक्यातील चिंचपाडा येथे घडवून आणली होती.अनेकवेळा आमच्या संस्कृत मंडळाचे वनभोजन रामी येथील महादेव मंदिरावर तर कधी तापी काठी (दाऊळ मंदाने) येथे संपन्न होत असे.सरांना विद्यार्थ्यांमध्ये रमायला खूप आवडायचे.ना.का.साठे सरांनी शिकवलेली जीवन कौशल्ये व संस्काराच्या शिदोरीवर आज शिक्षक म्हणून सेवा देतांना त्यांनी दिलेल्या शिकवणीतून विद्यार्थ्यांना शक्य तेवढे उत्तम ज्ञानदानाचे कर्तव्य बजावण्याचा प्रयत्न करीत आहे.

आमच्या स्व.ना.का.साठे सरांनी शिकवलेल्या संस्कृत गीतातील ओळी.

पठत संस्कृतम्, वदत संस्कृतम्
लसतु संस्कृतं चिरं गृहे गृहे च पुनरपि ।। पठत ।।
ज्ञानवैभवं वेदवाङ्मयं
लसति यत्र भवभयापहारि मुनिभिरार्जितम् ।
कीर्तिरार्जिता यस्य प्रणयनात्
व्यास-भास-कालिदास-बाण-मुख्यकविभि: ।।१।।
स्थानमूर्जितं यस्य मन्वते
वाग्विचिन्तका हि वाक्षु यस्य वीक्ष्य मधुरताम् ।
यद्विना जना नैव जानते
भारतीयसंस्कृतिं सनातनाभिधां वराम् ।।२।।

जयतु संस्कृतम्, संस्कृतिस्तथा
संस्कृतस्य संस्कृतेश्च प्रणयनाच्च मनुकुलम् ।
जयतु संस्कृतम्, जयतु मनुकुलम्
जयतु जयतु संस्कृतम्, जयतु जयतु मनुकुलम् ।।३।।

स्व.ना.का.साठे संस्कृत विषयात निपुण असणारे व विद्यार्थी प्रिय मुख्याध्यापक मला गुरु म्हणून लाभले याचा मनस्वी आनंद होतो.त्यांच्या सर्व आठवणींनी संपूर्ण शालेय जीवन डोळ्यासमोर उभे राहिले.

**(छोटू देवराम पाटील हे आर.सी.पटेल प्रा.शाळा शिरपूर जि.धुळे येथे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत )**

-९८८१०३३३४८

## शैक्षणिक विशेष...

### महाविद्यालयांच्या स्वायत्तता प्रक्रियेत वेग

अभ्यासक्रमांची निवड, परीक्षा पद्धती आदींबाबत उच्च शिक्षण संस्थांना स्वातंत्र्य देणाऱ्या स्वायत्तता धोरणाला आणखी वेग देण्याबरोबरच त्याचा विस्तारही केला जाणार आहे. आतापर्यंत पदवी अभ्यासक्रम चालविणाऱ्या महाविद्यालयांनाच स्वायत्तता बहाल करण्यात येत होती. परंतु, आगामी वर्षात पॉलिटेक्निक (पदविका) अभ्यासक्रम चालविणाऱ्या शैक्षणिक संस्थांनाही स्वायत्तता दिली जाणार आहे. २००९ साली देशभरातील १२२ विद्यापीठांमधील अवघी ३२४ महाविद्यालये स्वायत्त होती. २०२३मध्ये हा आकडा ९७९ वर गेला असून, भविष्यात आणखी महाविद्यालयांना स्वायत्तता बहाल केली जाणार असल्याची माहिती 'विद्यापीठ अनुदान आयोगा'ने (यूजीसी) आगामी वर्षातील योजनांचा आढावा घेताना दिली. महाराष्ट्रात २००९ साली मुंबई विद्यापीठातील एक, पुण्यातील चार, शिवाजी विद्यापीठातील दोन अशी काही हाताच्या बोटावर मोजता येतील इतकी महाविद्यालये स्वायत्त होती. मात्र, आता महाराष्ट्रातील १५७ महाविद्यालये शैक्षणिक स्वायत्ततेची फळे चाखत आहेत. महाराष्ट्रात मुंबई विद्यापीठातील सर्वाधिक ६१ महाविद्यालयांना स्वायत्तता बहाल करण्यात आली आहे. त्या खालोखाल पुण्यातील ३५ महाविद्यालये स्वायत्त झाली आहेत. कोल्हापूर विद्यापीठातील १७ आणि नागपूर विद्यापीठातील १५ महाविद्यालयांना स्वायत्तता मिळविण्यात यश आले आहे.

शैक्षणिक स्वायत्ततेमुळे अभ्यासक्रम, परीक्षा पद्धतीबाबत लवचिकता येत असल्याने आम्हाला औद्योगिक क्षेत्राच्या गरजेनुसार अभ्यासक्रम राबविणे शक्य झाले आहे. आम्ही राबवत असलेले अनेक अभ्यासक्रम पारंपरिक विद्यापीठांत उपलब्ध नाहीत. या अभ्यासक्रमांमुळे उद्योग क्षेत्राला आवश्यक असे प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्यास मदत होते. त्यामुळे हे विद्यार्थी येत्या काळात उद्योगक्षेत्रात सामावून घेतले जातील. संलग्नित विद्यापीठाने आखून दिलेल्या चौकटीतच अभ्यासक्रम, परीक्षा घ्यावी लागते. स्वायत्त संस्थांना नवे अभ्यासक्रम, परीक्षा पद्धती ठरवता येते. रोजगारक्षम असे अभ्यासक्रम या संस्थांनी राबविणे अपेक्षित आहे.

# एक स्वच्छतादूत...



**कैलास वाघ**
शिंदखेडे-धुळे

जिल्हा परिषद शाळा खलाणे येथे परिसरातील सर्वाधिक पटसंख्या असलेली इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतची प्राथमिक शाळा आहे. ही शाळा भौतिक सुविधा आणि लोकसहभातून सुसज्ज असून पहिली ते चौथीपर्यंत च्या प्रत्येकी दोन दोन तुकड्या आहेत व एकूण ०८ व ०१ मुख्याध्यापक शिक्षकांची पदे या ठिकाणी कार्यरत आहेत.

गावातील बहुतांशी पालक हे शेतकरी व शेतमजूर आहेत. त्यांची आर्थिक परिस्थिती साधारण परिस्थितील आहे. मोलमजुरी करून आपल्या पाल्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी शाळेला सहकार्य करत असतात.

आमच्या शाळेच्या दैनिक परिपाठात विविध नाविन्यपूर्णता असते. अश्या नाविन्यपूर्ण परीपाठामुळे धुळे जिल्हा परिषदेने खलाणे शाळेचा परिपाठ संपूर्ण जिल्ह्यात लागू केला आहे. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी भुवनेश्वरी एस यांनी परिपाठ प्रभावी अंमलबजावणी केली आहे. अशा आदर्श परिपाठात शाळेत येणारे विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्यात वैयक्तिक स्वच्छतेचा अभाव दिसत होता. या विद्यार्थ्यांना वारंवार सांगूनही त्यांच्यात अपेक्षित बदल घडत नव्हता. या दैनिक समस्येवर उपाय शोधण्यासाठी आमच्या शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक, शिक्षिका यांनी सहविचार सभा आयोजित केली होती. विद्यार्थ्यांना स्वच्छतेची



जाणीव कशी करून देता येईल याविषयी विचार मंथन झाले आणि सर्वानुमते स्वच्छता दूत या उपक्रमाची संकल्पना सुचली.

स्वच्छतेची सवय रुजवणे. विद्यार्थ्यामध्ये भावनिक कौशल्ये विकसित करणे. विद्यार्थ्यामध्ये सामाजिक,स्व अभिव्यक्ती विकसित करणे. दैनिक स्वच्छतेमुळे होणारे वैयक्तिक फायदे या विषयी जाणीव निर्माण करणे. या उद्देशाने उपक्र मास श्रीगणेशा के ला.

स्वच्छता दूत या उपक्रमाचे स्वरूप विद्यार्थ्यांच्या स्वतः च्या चांगल्या सवयी चे दृढीकरण व्हावे यासाठी या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली.शाळेत येतांना शालेय गणवेश नीटनेटका नखे, केस, बूट, मोजे, ओळखपत्र या सर्व बाबीं असलेल्या विद्यार्थ्यास अथवा विद्यार्थिनीस परिपाठात सर्व विद्यार्थ्यांसमोर स्वच्छता दूत म्हणून निवड करायची.

स्वच्छता दूत नावाचे बॅच लावून मुख्याध्यापकांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्याचे ठरले. सुरुवातीला विद्यार्थी काहीसे याबाबतीत सकारात्मक नव्हते. परंतु इतरांची निवड होत असतांना पाहून स्वतः त्या भूमिकेत गेल्यावर आपला ही असा सन्मान होईल हे त्यांना समजले.आणि मग त्यासाठी स्वतः मध्ये सकारात्मक आत्मविश्वास निर्माण झाला. या उपक्रमाची सविस्तर माहिती परिपाठात देण्यात आली व या उपक्रमाची अंमलबजावणी करण्याची सूचना मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना दिली. मग नेहमीप्रमाणे निकषानुसार एक विद्यार्थी अनेक विद्यार्थिनी यांची निवड करून त्याला बॅच लावण्यात आले आणि मग अशा प्रकारे दैनिक परिपाठात आपलाही सन्मान व्हावा यासाठी विद्यार्थ्यांमध्ये चढाओढ निर्माण झाली. जो तो आपापल्या परीने स्वच्छ आणि शाळेचे नीटनेटके कपडे घेऊन परिधान करून परिपाठात हजर राहू लागला. जणू एक आंतरिक प्रेरणाच निर्माण झाली. शाळेच्या दर्शनी भागात तीन बाय सहा चा भव्य आरसा बसविण्यात आला आणि मग विद्यार्थी स्वतः त्या आरशात पाहून मी कसा दिसतो ? मी कशी दिसते ? असा प्रश्न स्वतः ला विचारू लागला. काही दिवसात विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची जाणीव निर्माण होण्यास मदत झाली.आणि वरून मुख्याध्यापकांची शाबासकी यामुळे अधिकच त्यांचा हुरूप वाढलेला होता.

आपलाही सन्मान मुख्याध्यापकांच्या हस्ते कधी होईल याकडे सर्व विद्यार्थ्यांमध्ये चुरस निर्माण झाली.आणि त्याचा परिणाम दोन ते तीन महिन्यानंतर आपसूक दिसू लागला. मुलं पालकांना शाळेचा गणवेश, नखे, केस, नीटनेटकेपणा याविषयी बोलू लागले. स्वच्छता दूत या वचनाप्रमाणे दूत ज्याप्रमाणे स्वच्छतेचा संदेश देत असतो तो दूत दिवसभर सर्व वर्गावर जाऊन या स्वच्छतेचे संदेश आपल्या वर्ग मित्रांना सांगत असतो. आपल्याही वर्गातील विद्यार्थ्यांचा सन्मान व्हावा यासाठी वर्गशिक्षकही आपल्या मुलांना प्रेरित करत असतात.आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांचा सन्मान कसा होईल याकडे जाणीवपूर्वक लक्ष देतात.शाळा सुटल्यावर आपल्याला मिळायला बॅच हा मुख्याध्यापकांच्या कार्यालयात जमा करून दिवसभराचा आनंद मनात साठवत विद्यार्थी आपापल्या घरी जातात. या उपक्रमाचे अनेक फायदे मुलांना झाले.

जिल्हा परिषद शाळेतील मुलांना स्वच्छतेची जाणीव निर्माण झाली. स्वतः टापटीप नीटनेटका राहिल्याने आत्मविश्वास वाढतो. सन्मान झाल्यावर दिवसभर त्याच आत्मविश्वासाने शाळेत वावर असतो. सर आपला स्वच्छता दूत लावलेला ने सन्मान केलेला फोटो स्टेटस् ला ठेवणार याचा आनंद वाटू लागला. आपली मुल इतकी स्वच्छ व सुंदर झालेली हे सर्व गाव स्टेटस् वर पाहते,यामुळे पालकांना अत्यानंद होतो व एक प्रकारे स्वतःला प्रतिष्ठा प्राप्त झाली असे वाटते. स्वच्छता ही सवय नसून संस्कार आहे.हे गावातील इतर लोकांना समजायला लागले. त्यामुळे शाळेकडे पाहण्याचा नागरिकांचा दृष्टीकोन बदलला.एकंदरीत गावात स्वच्छता विषयी सकारात्मक वातावरण तयार झाले. शिक्षकांना गावातून कौतुकाचे मसेंज येऊ लागले.सर्वाकडून कौतुक सुरु झाले. वैयक्तिक स्वच्छता केंद्र स्थानी असल्याने विद्यार्थी आजारी पडण्याचे प्रमाण देखील कमी झाले. स्वच्छता ही आरोग्य विषयक सवय समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी हा उपक्रम उत्तम आहे.

**( कैलास गोविंदा वाघ हे प्राथमिक शिक्षक म्हणून जिल्हा परिषद शाळा खलाणे ता. शिंदखेडा जि. धुळे येथे कार्यरत )**

८८०६३९५५९७

आम्ही आहोतच वेगळे

# ब्लॅक रेन फ्रॉग!




प्रा.डॉ.नंदा हरम
पूणे

ब्लॅक रेन फ्रॉग! नावावरुन तुमच्या लक्षात आलं असेल की तो काळ्या रंगाचा असतो आणि पावसाळ्यात तो सक्रिय असतो. इतर दिवसांत तो जमिनीत खोल बिळात रहातो. याला 'प्लेन रेन फ्रॉग' (Main rain frog) 'आफ्रिकन रेन फ्रॅाग' तसेच अँग्री एवोकाडो (Angry Avoco(do) म्हणूनही ओळखतात. आता ही नांव का पडली? हा बेडूक फक्त आणि फक्त दक्षिण आफ्रिकेच्या नैऋत्य भागातील डोंगर उतारावर सापडतो. एवोकाडो नावाचं फळ आहे. त्या फळाचे बाह्यरुप आणि बेडकाच्या त्वचेमध्ये बघा किती साम्य आहे ते!




(आकृती क्र.१ पहा) त्यातून त्याच्या चेहऱ्यावरचे भाव असें असतात की, त्यामुळे त्याला हे नाव प्राप्त झाले आहे. पटलं ना तुम्हांला?

बाह्यरुप : हा बेडूक आकाराने लहान, साधारण दीड ते दोन इंच लांबी असते. शरीर अगदी गोलाकार असून पाय आखूड असतात. वजनाने हलका, जेमतेम ६ ग्रॅम वजनाचा असतो. आधी म्हटल्याप्रमाणे गडद तपकिरी किंवा काळ्या रंगाचा असून संपूर्ण शरीरावर छोटे–




छोटे उंचवटे असतात.

(आकृती क्र.२ पहा) त्याचे पाय चपटे असून फावड्याच्या आकाराच्या गाठी असतात. त्यांचा माती खणताना उपयोग होतो. त्यांच्यावर अंगावर असलेले उचंवटे चामखीळीसारखे भासतात. भक्षकांना ते विषारी वाढतात. प्रत्यक्षात ते विजारी नसतात.

वास्तव्य : जगभरात फक्त ते दक्षिण आफ्रिकेतच आढळतात. विशेष म्हणजे १००० मीटरपेक्षा जास्त उंचीवर ते राहतात. थंड आणि दमट वातावरण त्यांना सहन होतं, तसेच खूप जास्त उष्ण

आणि कोरड्या हवामानातही ते तग धरतात. ते जमिनीखाली रहात असल्यामुळे वालुकामय माती त्यांना आवडते. त्यात खणणे सोपे पडते. जमिनीखाली राहिल्यामुळे भक्षकांपासून संरक्षण होते तसेच मातीतील बाष्प आणि भक्ष्य ही उपलब्ध होते. हे बेडूक दिवसा पूर्णवेळ जमिनीखालीच असतात. ते निशाचर आहेत. फक्त प्रजनन काळात किंवा जोरदार पाऊस असेल तेव्हां ते दिवसाबाहेर पडतात.

भक्ष्य आणि भक्षक : या बेडकांचे मुख्य खाद्य म्हणून कीटक, विशेषकरुन वाळवी, मुंग्या, माश्या, नाकतोडा, रानकिडा तसेच माती खणताना कीटकांच्या अळवा, कोळी, पतंग, आणि इतर अपृष्ठवंशीय प्राणी फस्त करतात.

या बेडकांचे मुख्य भक्षक साप आणि गिधाडांसारखे काही पक्षी होत. असं ही आढळून आलं आहे की जेव्हां हे बेडूक रात्री भक्ष्य पकडण्यासाठी बाहेर पडतात. तेव्हा झाडा-झुडपानं फिरणाऱ्या डुकरांना या बेडकांची मेजवानी मिळते.

गोलाकार शरीर आणि आखूड पायांमुळे हे बेडूक उड्या मारु शकत नाहीत किंवा पोहताही येत नाही. ते चालू शकतात. पण वेग मंद असल्यामुळे भक्षकांना त्यांना पकडणे सोपे जाते. भक्षकांना पळवून लावायच्या काही क्लृत्या त्यांच्याकडे आहेत. ते त्यांच्या शरीराच्या आकारापेक्षा सात पटीने शरीर फुगवू शकतात. त्यामुळे ते आहेत त्यापेक्षा मोठे भासल्यामुळे भक्षक घाबरतो. तसेच या क्षमतेचा वापर ते बिळात असताना करतात. त्यामुळे ते बिळात घट्ट बसतात, भक्षकांना त्यांना बिळातून बाहेर काढणे अवघड होते. माती खणण्याच्या बाबतीत ते वाकबगार असतात. शास्त्राज्ञांनी त्यांच्या वेगाचा अंदाज घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, त्यांच्या डोळ्यादेखत अक्षरश: काही सेकंदात ते बिळात नाहीसे होतात. या गोष्टीचा फायदा त्यांना संरक्षणाकरीता होतो.

विशेषता : तुम्हांला माहित आहे की बेडूक उभयचर प्राणी आहे. सर्वसाधारण बेडूक पाण्यात छान पोहू शकतो. पण हा 'ब्लॅक रेन फ्रॉग' मात्र पाण्यात पोहू शकत नाही. कारण येतंय ना लक्षात! बरोब्बर... त्याच्या आखूड पायांमुळे. तो जिथे राहतो, तिथे जवळ तो फारतर पाण्यात तरंगू शकतो. पण जर चटकन त्याला जमिनीवर जायला मिळाले नाही तर तो चक्क बुडू शकतो! ऐकावे ते नवलच! नाही का?

त्यांचं वास्तव्याचं ठिकाण आणि ते निशाचर असल्यामुळे फारसे दृष्टिस पडत नाहीत. परंतु पावसाळ्यात किंवा प्रजननाच्या काळात ते तीव्र स्वरात ओरडतात. सगळे बेडूक एकदम ओरडायला लागले की, वातावरणात आवाज भरुन राहातो. प्रजननाच्या काळात बिळातूनच जोरात ओरडून ते मादीला आकर्षित करतात. तिच्याकरिता स्वच्छ भुयार तयार करुन ठेवतात. तसा हा बेडूक एकटं रहाणंच पसंत करतो, फक्त प्रजननाच्या काळात ते एकत्र येतात. तसेच जेव्हां भक्ष्य भरपूर प्रमाणात उपलब्ध असते, तेव्हां अनेक बेडूक शेजारी रहाताना दिसून येतात. मादी बिळामध्ये खोलगट जागेत ४० अंडी घालते. त्यानंतरची संरक्षणाची जबाबदारी नर आपल्यावर अंगावर घेतो.

तुम्हांला माहित आहे की, बेडकाच्या जीवनचक्रात बेडूक मासा (Tadpolo) ही एक महत्त्वाची अवस्था असते. हा बेडूक मात्र त्याला अपवाद आहे. अंड्यातून पूर्ण विकसीत झालेला पण आकाराने लहान बेडूक बाहेर पडतो. यांना 'फ्रॉगलेट' (Froglet) म्हणतात. ते पूर्णपणे स्वतंत्र असतात.

पिवळ्या रंगाची अंडी केवळ ५ मि.मी. व्यासाची असतात आणि त्यांच्याबाहेरील कवच ८ मिमी त्यासाचं असतं. आधी निर्देश केल्याप्रमाणे पूर्ण लहान आकाराचा बेडूक तयार होऊन




(आकृती क्र.३ पहा.) तो बाहेर येतो. नर सहसा मादीपेक्षा लहान आकाराचा, जेमतेम निम्मा असतो.

परिसंस्थेमध्ये या बेडकाचं महत्त्व आहेच. कारण कीटक हे याचे मुख्य खाद्य असल्यामुळे त्यांच्या संख्येवर नियंत्रण रहावं. तसेच बिळ तयार करण्याकरीता माती खणल्यामुळे पोषक द्रव्ये मातीत पोहोचतात. त्यांनी केलेल्या उत्खननामुळे कीटक व इतर छोट्या सजीवांना आश्रय मिळतो. कसा वाटला हा 'ब्लॅक रेन फ्रॉग?' दक्षिण आफ्रिकेतील नैऋत्य भाग, हे त्याचे एकमेव अढळ स्थान!

पुस्तक परिक्षण..

# चटकन डोळ्यात पाणी आणणारी भुई आणि बाई



**प्रा. युवराज पवार**
शिरपूर

युवराज पवार खानदेशातील नव्या ताकदीचा उमदा युवा कवी अशी मी  प्रविण पवार यांची ओळख करून देतो. प्रविण पवार यांनी आता पर्यंत साहित्य अकादमी दिल्ली तर्फे घेतल्या जाणाऱ्या राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय साहित्य उत्सवामध्ये चारदा काव्य वाचनाच्या माध्यमातून आपल्या खानदेशच्या मातीचा गौरव केला आहे. त्यामुळे त्यांची कविता केवळ खानदेशची नसून ती संपूर्ण भारतातील आदिवासी समाजाचं प्रतिनिधित्व करते. अल्पावधीतच त्यांनी साहित्य क्षेत्रात आपले नाव लौकीक केले आहे. खानदेशाला यापूर्वीच अनेक कवी कवयित्रींची पार्श्वभूमी लाभलेली आहे. खानदेशात सर्व स्तरातून लेखन करणारे दिग्गज साहित्यिक आढळून येतात. साहित्यिकांच्या या मांदियाळीत प्रविण पवार या कवीने दमदारपणे प्रवेश केला आहे. त्यांचा 'माझी मिडल क्लास कविता' 'जात्कीजोत', 'भुई आणि बाई 'असे तीन कवितासंग्रह प्रकाशित झाले असून त्यांचा 'भुई आणि बाई' या संग्रहातील कविता खानदेशच्या भुई आणि बाईच्या अस्मिता, अस्तित्वाची कळकळीने दखल घेणारी कविता आहे.

शेतशिवार, निसर्ग, भुई आणि बाई या प्रतिमा डोळ्यासमोर ठेवून बहिणाबाई चौधरी, ना.धो. महानोर यांसारख्या कवी कवयित्रींनी काव्य लेखन जरी केले असले तरी प्रवीण पवार या कवीने हाच धागा पकडून भुई आणि ग्रामीण स्त्रीचे भावविश्व आपल्या अनुभवाच्या पातळीवर मांडण्याचा जो स्तुत्य प्रयत्न केला आहे. त्यात कवी निश्चितच यशस्वी झाला आहे.

प्रविण पवार हा युवा कवी अत्यंत संवेदनशील, हळव्या मनाचा आहे. ज्या मातीत, परिसरात तो वाढला, शिकला. त्या परिसरातील ग्रामसंस्कृतीचे

तेथील जीवन जाणिवांचे, तेथील आचार विचारांचे त्याच्या मनावर झालेल्या चांगल्या वाईट अनुभुतीतून कवी उभा राहिला आहे. दुसरे असे की, तो माती आणि बाईशी तादात्म्य पावलेला आहे. स्वतः शेतमजूर स्त्रियांसोबत शेती मातीत काम करतांना आणि आपल्या भोवतालच्या परिसरातील स्त्रियांच्या जीवनांचे जवळून निरिक्षण करतांना कवीच्या मन पटलावर जे भाव संवेदन उमटतात त्याच भाव संवेदनेतून या कवीची कविता फुलली आहे. असे एकंदरीत 'भुई आणि बाई' या संग्रहातील कविता वाचतांना वाटते. या कवितांमागे निश्चित एक घटना, एक प्रसंगानुभाव दडलेला आहे. प्रत्येक एक कविता आपल्या मुशीतून एक विषय घेऊन वाचकाच्या समोर येते. विसरल्या न जाणाऱ्या गतकाळातल्या वेगवेगळ्या आठवणीचा गोतावळा या कवितेतून दिसून येतो.

'भुई आणि बाई' या संग्रहातील कविता वाचतांना अनेक प्रश्न पडतात. हे प्रश्न साधे नाही तर फार महाभयंकर आहेत. अस्वस्थ करून सोडतात. आपण असंच जर वागलो तर? किंवा या प्रश्नांकडे दुर्लक्ष केलं तर? उद्या आपल्या हातात पश्चतापाशिवाय काहीच उरणार नाही. येणारा भविष्यकाळ आपल्याला कदापि माफ करणार नाही. अती आणि तात्काळ उत्पन्नासाठी बाजारात येणारी रसायने आणि खुल्या बाजार पेठा यामुळे चाललेली चढाओढ आणि जागतिकी करणामुळे माणसा माणसाच्या मनात निर्माण होत चाललेला माया मोहाचा स्वार्थ, या साऱ्या रगाड्यात आपण सारेच भुईच्या जीवावर उठलो आहोत. हे सत्य कुणाला ही नाकारता येणार नाही. रस्ते, पुल, धरणे यासाठीचे काँक्रीटीकरण हे ग्लोबल वॉर्मिगला आव्हान करणाऱ्या मानवी भौतिक सुख सुविधांमुळे आज भुईची दमछाक होते आहे. पर्यावरणाचा अतोनात नास होतोय. विश्वगुरू बनू पाहणाऱ्या डिजिटल भारतातील कृषिप्रधान व्यवस्थेशी जुळलेल्या ग्रामीण भागातील जात समूहाचे जीवन किती आणि कसे नासुर कष्टप्रद असून त्यांची दयनीय स्थिती किती हलाखीची आहे. हा सगळा मजकूर कवितेतून वाचून टचकन डोळ्यात पाणी येतं. काळजाला पीळ पडतो. स्वातंत्र्य समता बंधुता हया सगळ्या संकल्पना थिट्या पडतात.

'भुई आणि बाई'च दुखं हे आदिम आहे. त्यांच्या व्यथा वेदनेत थोडा फार फरक असेल परंतू दुःखाची जातकुळी एकच आहे. बाई बोलू शकते. व्यक्त होऊ शकते परंतू भुई बोलू शकत नाही. तिला व्यक्त होता येत नाही. हे जरी सत्य असले तरी भुईच्या दुःखाची तीव्रता ही जाणून घेता येते. समजून घेता येते. म्हणून कवी तिच्याशी हितगूज करतो. तिची आर्तता समजून घेतो. तिच्या वेदनेला शब्दरूप देतो. दोघींच्या दुःखांची तुलना करतो. येणाऱ्या पुढच्या पिढीसाठी भुई आणि बाई शाबूत कशी राहिल याची करुणा भाकतो. बाई जन्म देते आणि भुई पोसते हे सत्य समाजाला ज्ञात असून ही बाई आणि भुईवर अनन्वित अत्याचार केला जातो. तो थांबायला तयार नाही. ही सल कवीला अस्वस्थ करते. ( प्रजिमा) काल्पनिक स्त्रीला आपल्या मनात निर्मुन तिच्याशी संवाद साधत कवी रात्री बे रात्री हातात पेन घेऊन आपल्या मनाची अस्वस्थता कागदावर लिहून मोकळा होतो.

प्रविण पवार या कवीच्या कवितेत वाघरी, अहिराणी, भाट, भिलाऊ, पावरा बोली आणि प्रमाण भाषेचा सुंदर असा मिलाफ पहावयास मिळतो. या सगळ्या बोलींच्या उपयोजनामुळे त्यांच्या कवितेला सौंदर्याचा एक तजेल जिवंतपणा लाभल्याचा प्रत्यय

कवितेतून येत राहतो. शेतीमातीत कष्ट उपसणाऱ्या कष्टकरी स्त्रियांच्या तोंडातून निघणाऱ्या संवाद रूपी बोलीतली ही कविता काळजाला भिडते. त्यांचा 'जात्कीजोत' हा कवितासंग्रह पूर्णतः वाघरी बोलीतून त्यांनी लिहिला आहे. बोली भाषेचं संवर्धन व्हावं, तिला वाचक मिळावा हा त्यांचा प्रांजळ प्रामाणिक हेतू आहे. आज आपण पाहत आहोत अनेक बोली भाषा मृत पावत चाललेल्या आहेत. त्यांनी वाघरी बोलीचं केलेलं संवर्धन उद्याच्या पिढीसाठी मार्गदर्शन करणार ठरेल यात तिळमात्र शंका नाही. भुई आणि बाई विषयी आपल्या मनोगतात प्रविण पवार म्हणतात. भुई च्या व्यथा गुगलच्या बांधावर बसून कळणार नाहीत, त्या कळतील तर प्रत्यक्ष वर्तमानातला भुईगर्भ समजून घेतल्यावरच. का ? तर भूक लागली की गुगलवर भाकर डाऊनलोड करता येणार नाही ना ? आणि सुदृढ गर्भ असल्याशिवायही भविष्याचा विचार पण करता येणार नाही. मग तो गर्भ भुईचा पिक पाण्यासाठी असो वा बाईचा पुढील पिढीसाठी भुई आणि बाईच्या रक्षणार्थ प्रविण पवार यांनी लेखणी उचलली आहे. आपल्या कवितेतून ते भुई आणि बाईच्या वेगवेगळया पैलूंचा शोध घेतात.

पहिल्याच कवितेत कवी खेड्यातील एका कष्टकरी महिलेच्या स्वाभिमानाची नि तिच्या खानदानीपणाची ओळख करून देतात. खेडयातील महिला किती काटक आहे. कामसू वृत्तीची आहे. तिच्या स्वभाव गुणवैशिष्ट्यचा चांगला दाखला कविने दिला आहे... तिच्या बोटांना जिवाई लागली आहे. बोटांना रक्त फुटलेलं आहे. बोटांना झालेल्या जखमा विसरून ती आपल्या कुटुंबासाठी शेतात कापूस वेचण्याचं काम करते आहे. यावरूनच ग्रामीण स्त्रियांच्या सोशिक्तेचा सहनशीलतेचा धाडशीपणाचा प्रत्यय आपल्याला लक्षात येतो.

भुईची कथा आणि बाईची कहाणी कशा स्वरूपाची आहे. हेही कवी चाणाक्षपणे लक्षात आणून देतो.
भुईची कथा

बाईंची मी कहाणी

युगे शहाणी (भुई अन् बाई पृ. क्र.१६) युगे शहाणी झाली परंतू भुई आणि बाईचा छळ मात्र अजून संपला नाही. बाई अजूनही पाहिजे तेवढी आत्मनिर्भर झाली नसून ती आजही परावलंबी आहे. स्त्रीचं जीवन म्हणजे अनेक अडचणींनी, मनस्तापाने भरलेलं आहे. समाजाने दिलेल्या छळाची तीव्रता कमी व्हावी म्हणून बाई भुईला साद घालते.भुईही बाईशी बोलते. दोघीही एकमेकाशी संवादातून आपल्या झिजवलेल्या हयातीचा दाखला देतात. दोघीही आपल्या अनंत दुःखात बुडून जातात. बाईचा गर्भ पिकला नाही तर तिला वांझ म्हणून हिणवले जाते तर न पिकणाऱ्या भुईला पडीक भुई आणि बाईंच्या वेदनेला सीमाच नाही.त्या सर्जक जरी असल्या तरी त्यांना बोलण्याची मुभा पुरूष प्रधान व्यवस्थेने दिलेली नाही. ही सल, घुसमट दोघींच्याही मग संवादातून प्रकटते .

–७८८७८२३०५१

मराठी मासिक
शिक्षणयात्री
हे मासिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक,संपादक शैला नंदकिशोर हजारे यांनी मुद्रक लक्ष्मण गोरख बडगुजर यांच्या मालकीच्या प्रगती आर्टस्,पोलिस स्टेशन जवळ,जनता नगर शिरपूर जि.धुळे ४२५४०५ (महाराष्ट्र) येथे छापून ,प्लॉट नं. ५२ शिवपार्वती कॉलनी,करवंद नाका,शिरपूर जि.धुळे ४२५४०५ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.संपादक – शैला नंदकिशोर हजारे Reg No.MAHMAR2015/67226

समृद्ध शिक्षण संस्कारासाठी...
मासिक शिक्षणयात्री
संपूर्ण महाराष्ट्रात वितरीत होणारे शैक्षणिक सामाजिक क्षेत्राला वाहिलेले मासिक...

# शिक्षणयात्री मासिकाचे सभासद व्हा...

- शाळा अनुदान, समग्र अनुदान,४% अनुदान यातून वर्गणीदार होण्यासाठी खर्च करू शकतात.
- शाळासिध्दी मुल्यांकनात मासिकाचे वर्गणीदार असणे आवश्यक.
- आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी नियतकालीकातून लेख प्रसिध्द होणे गरजेचे.

वार्षिक वर्गणी 500/- | द्वि-वार्षिक वर्गणी 900/- | त्रै-वार्षिक वर्गणी 1300/-

मासिक शिक्षण यात्री वर्गणी PFMS पीएफएमएस ने पाठवण्यासाठी

बँक ऑफ बडोदा

बँक खाते नाव – शिक्षणयात्री

खाते नंबर : 13320200000322

IFSC Code : BARB0SHIRPU

Vendor Code : VAMHDH00055645

Unic Code : VAMHDH00055645


**महत्त्वाचे :**

मासिक शिक्षणयात्री दरमहा पोस्टाने पाठविले जाते. वर्गणीदार झाल्यास शाळेचा/स्वत:चा/मुख्याध्यापक यांचा पूर्ण पत्ता (पिनकोड सह) पाठविणे आवश्यक आहे. (वर्गणी पावती पाठविली जाईल.) Whats app No.: 9850964601

**टिप :** शैक्षणिक लेख,विचार,अनूभव,तसेच स्वरचित कथा कविता पाठवावयाचे असल्यास शिक्षणयात्री या मेलवर पाठवावा. सोबत स्वत:चे नांव,पत्ता,शाळा,पासपोर्ट साईज फोटो पाठवावा. वर्गणी चेक/डि.डी./मनीऑर्डर संपर्क पत्यावर पाठवावे.

संपादक

Reg No. MAHMAR2015/67226 शिक्षणयात्री Postal Registration No.DHL/557/2021-23










## सहकार्याचे विनम्र आवाहन...

शिक्षण यात्री मासिक नियमित प्रकाशन करताना होणारी आर्थिक कसरत पहाता आपणांस वर्गणीदार होऊन शिक्षण यात्री मासिकास आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याची कळकळीची विनंती!!!!

वार्षिक वर्गणी- ५००/- रूपये    वार्षिक वर्गणी- ९००/- रूपये    वार्षिक वर्गणी- १३००/- रूपये

ई अंक (फक्त पी.डी.एफ.) व्दिवार्षिक वर्गणी - ६००/-रूपये

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.

Online पेमेंट साठी--- खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri

बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No--13320200000322 Ifsc-BARB0SHIRPU

**....वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे....**

With pay any app


संपर्क पत्ता- संपादक शिक्षण यात्री

शैलनंद,प्लॉट नं.५२ शिवपार्वती कॉलनी करवंद नाका शिरपूर ता.शिरपुर जि-धुळे ४२५४०५

(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)



**Postal Registration No.DHL/557/2021-23**



संपादक - शिक्षण यात्री
शैलनंद,प्लॉट नं.५२ पार्वती कॉलनी,
करवंद नाका,शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे
४२५४०५


प्रती, ................................................
................................................
................................................


Pragati Arts Shirpur 8421356261